॥ ॐनमश्चंडिकायै ॥

# काव्यकुसुमांजलि.

लेखकः 861.6

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी,
शेंदुर्णीकर.

१९१६

मुंबई-मनोरंजन छापखान्यांत छापिलें.

861.6
Tiw
5485

१० आणे.

॥ ॐ नमश्चंडिकायै ॥

# काव्यकुसुमांजलि.

रसिक चित्तविहारिणि मानिनी,
रमवि जी जनिं वा घन-काननीं;
सरस मंजुल-वर्ण-पदान्विता,
सुकविता भवताप हरी स्वतां.

लेखकः—

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी, शेंदुर्णीकर,

सेकंड असिस्टंट मास्तर, सावदें.

[ प्रथमावृत्ति ]

प्रति ५००.

फेब्रुवारी १९१६ इसवी

किंमत १० आणे.

( ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

Printed by K. R. Mitra, at the Manoranjan Press, 1, Girgaon Rd., Bombay,
and
Published by Durgaprasad Asaram Tivari, at Savade, Dt. Khandesh.

# विषयानुक्रम.


| | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ग्रंथकर्त्याचे दोन शब्द. | | | |
| प्रस्तावना. | | | |
| अर्पणपत्रिका. | | | |
| काव्यार्पण. | | | १ |
| पुष्प | १ लें, | कविता. | ४ |
| ,, | २ रें, | कविकाव्यवृत्ति. | ८ |
| ,, | ३ रें, | लतिकेस. | १० |
| ,, | ४ थें, | काव्यरत्नावलीचा अंक पाहून. | १४ |
| ,, | ५ वें, | उखाणें. | १६ |
| ,, | ६ वें, | मित्रविरह. | १८ |
| ,, | ७ वें, | शारद–श्री. | २० |
| ,, | ८ वें, | जिजाईचा पुत्रविरह. | २३ |
| ,, | ९ वें, | माझी कहाणी. | २७ |
| ,, | १० वें, | गड आला पण सिंह गेला. | ३० |
| ,, | ११ वें, | विरहिणी. | ३८ |
| ,, | १२ वें, | वियोगिनी. | ४१ |
| ,, | १३ वें, | सुप्त सखी. | ४४ |
| ,, | १४ वें, | पंजरस्थ विहग. | ४७ |
| ,, | १५ वें, | फुगडी. | ४९ |
| ,, | १६ वें, | भुजंगा ! | ५२ |
| ,, | १७ वें, | सृष्टीची गौर. | ५४ |
| ,, | १८ वें, | तेंच हें स्थान ! | ५८ |
| ,, | १९ वें, | हा कशाचा परिणाम ? | ६८ |
| ,, | २० वें, | विहार. | ७५ |

| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठ. |
| पुष्प | २१ वें, चंद्रदूषण. | ७७ |
| ,, | २२ वें, तारापतन. | ७९ |
| ,, | २३ वें, चितोरगडचा वेढा. | ८१ |
| ,, | २४ वें, विषमता. | ९१ |
| ,, | २५ वें, समस्यापूर्ति. | ९२ |
| ,, | २६ वें, घना ! | ९४ |
| ,, | २७ वें, बा ! दावानला ! | ९६ |
| ,, | २८ वें, एका कवीचा सरस्वतीमंदिरप्रवास. | ९८ |
| ,, | २९ वें, एका दुःखितास– | १०१ |
| ,, | ३० वें, टेनिस. | १०३ |
| ,, | ३१ वें, ब्रिटिश राज्यापासून फायदे. | १०६ |



धैर्यौदार्य चूडामणि श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव
गंभीरराव, देशमूख, देशपांडे, सरकानगो, सावदें.

# समर्पण.

धैर्यौदार्यचूडामणि श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव

गंभीरराव देशमुख देशपांडे सरकानगो सावदें

यांची विद्वत्ता, रसिकता, स्वधर्माभिमान,

दयाशीलत्व, परोपकार

इत्यादि गुणांवर लुब्ध होऊन

**ही काव्यकुसुमांजलि**

त्यांच्या पदीं वाहिली.

**दु. आ. तिवारी, शेंदुर्णीकर,**

सेकंड अ. मास्तर, सावदें.



दु. आ. तिवारी.

# ग्रंथकर्त्याचे दोन शब्द.

आजवर वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या कविता पुस्तकरूपानें प्रसिद्ध कराव्या, हा हेतु फार होता. परंतु द्रव्याभावामुळें तो दाबून ठेवावा लागला. पुढें येथील सन्मान्य, सद्रसिक श्रीमंत अण्णासाहेब देशमुख यांची मुद्दाम भेट घेऊन वरील हेतूविषयीं त्यांस विनंति केली, व त्यांनींही प्रेमळपणें माझ्या या विनंतीस रुकार दिला, व द्रव्यद्वारें आश्रय देऊन तो सिद्धीस नेला. याविषयीं मनाला जें समाधान वाटत आहे, त्याचें सर्व श्रेय त्यांजकडेच आहे.

या कवितांच्या एकीकरणाच्या व प्रकटीकरणाच्या बाबतींत येथील माझे मित्र रा. रा. यशवंत व्यंकटेश कुळकर्णी, फ. अ. मास्तर, आणि माझे बालमित्र रा. रा. रामकृष्ण वेडू रंगारी, फ. अ. मास्तर, न्हावी, यांनीं जी वेळोवेळीं मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

छापखाना व माझें रहाणें यांत बरेंच अंतर असल्यानें कांहीं अशुद्धें राहिलीं असल्यास, त्याबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

**दु. आ. तिवारी,**

अ. मा. सावर्दे.

इ. ग्रं. ५. 
5485
8616/Tiw
5I4K

## प्रस्तावना.

**कान् पृच्छामः सुराः स्वर्गे निवसामो वयं भुवि ।**
**किंवा काव्यरस स्वादु किंवा स्वादीयसि सुधा ॥१॥**

" कोणाला विचारावें, काव्यरस गोड किंवा अमृत गोड ? देव राहिले स्वर्गांत आणि आम्ही राहिलों पृथ्वीवर !" ह्या काव्याच्या केलेल्या यथार्थ वर्णनाचा प्रत्यय खऱ्या रसिकांस खऱ्या कवींच्या जिवंत काव्यानें आल्यावांचून राहणार नाहीं. असलीं काव्यें व त्यांचे निर्माते कवि जरी हल्लींच्या काळीं निर्माण झाले नाहींत, तरी पण आज गद्याच्या वाचकांपेक्षां पद्याचे वाचकच फार कमी ! व आहेत त्यांतहि आधुनिक कवि आणि अर्वाचिन कवि यांच्या तुलनात्मक वादांत व सयमक—निर्यमक कवितेच्या चाललेल्या ऊहापोहांत ते वाहतच चाललेले आढळून येतात.

एक काळ असा होता कीं, त्या वेळीं गद्यापेक्षां पद्यासच विशेष महत्त्व आलेलें होतें. सरस्वतीमंदिराच्या जुन्या व ओबडधोबड दिसणाऱ्या गद्यरूप भिंतींपेक्षां त्याच्या उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या काव्याच्या उंच उंच मनोऱ्यांकडेच सर्व सारस्वतांचें लक्ष वेधलें होतें. पुढें १९ व्या शतकांत महाराष्ट्र-भाषेंत जी क्रांति घडून आली, तिनें हें पारडें फिरलें. नवीन विचार, नवीन कला यांच्या साहाय्यानें गद्याची उभारणी चांगली झाली. ह्मणून सर्वांचें लक्ष तिकडे वेधल्यानें कवि व त्यांचें काव्य यांविषयीं तितकी आदरबुद्धि दिसून येईनाशी झाली, व ह्मणूनच त्यांच्या हातून पूर्वींच्या कवींप्रमाणें काव्याचे विशाल मनोरे उभारले गेले नाहींत.

कालस्थितीच्या मानानें बदलणारी परिस्थिति लक्षांत घेतां, पाश्चात्य आचारविचारांनीं, कलाकौशल्यांनीं त्यांच्या आणि आमच्या संस्कृतीची सर-भेसळ होऊन आमची समाजस्थिति बदललेली आहे. काव्यापेक्षां नाटकें व कादंबऱ्या यांचेच वाचक फार ! हल्लींच्या या निराशाजनक काळीं आधुनिक कवींच्या हातून प्राचीन कवींप्रमाणें लोकोत्तर काव्यग्रंथ निर्माण होणें अशक्य ह्मणून काव्यरत्नावलीनें त्यांच्या स्वल्प, स्फुट व प्रासंगिक काव्याचा आज २५

वर्षे संग्रह केला. एवढ्या काळांत बऱ्याच चांगल्या कवींचा महाराष्ट्रीयांस परिचय झाला. त्यांपैकींच श्रीयुत तिवारी हे होत. त्यांच्या बहुतेक कविता आजवर काव्यरत्नावलींतून व कांहीं इतर मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. आधुनिक कवींनीं ठिकठिकाणीं विखुरलेल्या आपापल्या काव्यकुसुमांचें एकीकरण करून त्यांचे गुच्छ महाराष्ट्रीय रसिकांच्या हातीं देण्याचें सुरू केलें. हें करणें इष्ट असल्याचें आह्मीं आपलें मत यापूर्वींच प्रसिद्ध केलें आहे. प्रस्तुतची काव्यकुसुमांजलि हें त्याचेंच अनुकरण होय.

या अंजलींत लहानमोठीं ३१ पुष्पें असून त्यांतील कांहीं पुष्पांचा सुवास खरोखरच मनाला रमविणारा आहे. 'तेंच हें स्थान !' हें प्रकरण चांगलें साधलें आहे. 'माझी कहाणी'सारख्या वस्तुस्थितीचें यथार्थ चित्र दाखविणाऱ्या हृदयस्पर्शकारक व परिणामकारक काव्याची आमच्या समाजास फार आवश्यकता आहे. 'कविता,' 'घना !' 'लतिकेस' हीं सयमक प्रकरणें वाचकांनीं अवश्य वाचावीं. 'उखाणें,' 'फुगडी,' 'पंजरस्थ विहग' वगैरे कांहीं कवितेंत कवीचें विषयाशीं चांगलेंच तादात्म्य झालेलें आढळून येतें. कांहीं प्रकरणांत तेच शब्द, त्याच कल्पना व त्याच उपमा आढळून येतात. 'गड आला पण सिंह गेला,' व 'चितोरचा वेढा' या दोन ऐतिहासिक प्रकरणांत हें आढळून येईल. 'सुप्तसखी' यांतील शृंगार फार उत्तान झाला आहे. तरी पण सर्व पुष्पांच्या एकंदर सुगंधांत रसिक भृंग गुंग होईल, असें मला वाटतें.

श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य संस्थान संकेश्वर आणि करवीर यांजकडून 'धैर्यौदार्यचूडामणि' या पदवीप्रत प्राप्त झालेले श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव देशमुख देशपांडे सरकानगो सावदें यांच्यासारख्या सद्रसिक, गुणग्राहक व विद्वान गृहस्थांस श्रीयुत तिवारी यांनीं सदरची काव्यकुसुमांजलि अर्पण केली, व त्यांनींही तिचा स्वीकार केला, आणि त्यांच्या सत्कृतीचें चीज करून महाराष्ट्र काव्यवाङ्मयाची जी सेवा केली, त्यायोगें ते स्तुतीस पात्र आहेत.

| | |
|---|---|
| **जळगांव,**<br>तारीख २६।१०।१९१५. | **नारायण नरसिंह फडणीस,**<br>संपादक–काव्यरत्नावली. |

# काव्यकुसुमांजलि.

## काव्यार्पण.

**श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव**
**गंभीरराव देशमूख देशपांडे**
**सरकानगो यांचे पदीं**
**ही काव्यकुसुमांजलि वाहिली.**

शार्दूल विक्रीडित.

**श्री लक्ष्मी** हि **सरस्वती** न वसती, एकत्र भूमंडळीं,
**मं**जूल ध्वनि शारदा करि जिथें लक्ष्मी न सन्मंडलीं;
**त**त्संयोग विभो! तुह्मांत घडला आनंद वाटे मना,
**स**त्प्रेमें अजि योग येइ सहसा वर्णावया या जना. १

**र**क्ताचे बहु पूर वाहवुनियां शत्रू किती दापिले,
**दा**वूनि निजशौर्य पूर्वज रणीं गेले असे आपले;
**र**म्याकीर्ति तदीय ती श्रवुनियां झालोंचि रोमांचित,
**गं**धें चंदन वृक्ष पूज्य जगतीं होती पहा, निश्चित. २

**गा**जावें जगिं खड्ग घेउनि करीं कीं सद्गुणांच्या भरें,
**ध**न्यत्वाप्रति पावतां स्वतनुचें सार्थक्य होई बरें;
**र**त्नें मानवरूपिं जीं झळकलीं भूमंडळाभ्यंतरीं
**रा**ष्ट्राच्या नव भूषणापरि तुह्मी भो! वाटतां अंतरीं. ३

वर्षावेंचि सुपूर्ण काय जगतीं होईल तो सागर,
रत्नांचे नवदीप पाजळुनि कां तेजस्वि हो भास्कर;
घुर्णावी नयनद्युति तरुणिची अन्येंचि कां कारणें,
नाना सद्गुणिं पूर्ण तुह्मि असतां म्यां काय, तें सांगणें. ४

थट्टेखोर कितीक व्यर्थ हंसती काव्यास रात्रंदिन,
राया ! सद्रसिकाविना न कविता ती दाखवावी क्षण;
वर्णावें जरि वर्णणेंच जगतीं ते सद्गुणांचे गुण,
गंधर्व स्तविती सुरा न असुरा मीं जाणिली ही खुण. ५

भीडस्त स्वकिय स्वभाव अपुला सोडूनियां मीं खरा
रम्य प्रस्तुत काव्यगुच्छ अजि हा घेऊनि आलों बरा;
राजन्या ! मजसी कथा किति रुचे हूंगूनियां सत्वरें,
वर्मज्ञाविण मर्म कोण विषयीं जाणील सांगा ? बरें. ६

देवानें सुतरत्न देउनि तुह्मा संतोषवावें झणिं,
शब्दानें नच हेतुपूर्वक तया प्रार्थीतसें या क्षणीं;
मुग्धाप्रीतिलता–सुमें विकसती त्यांच्याच गेहांतरीं
खड्गाग्रासम एकपत्निव्रत हें जे पाळिती अंतरीं. ७

देवो श्रीहरि आपणास रुचिरा ! दीर्घायु या भूतलीं,
शक्तीनें बहु पापपंक्तिहि जयें रक्षूनि निर्धूतली;
पांडित्येंहि न वर्णवे निवसला जो विश्व–तंबूतुनी
डेरा हा गगनप्रदेश उभवी दोन्ही ध्रुवा सांधुनी. ८

सन्मान्या ! कवि कालिदास वदतां भोजस्मृती होतसे,
रक्षी जो कवि ‘ बाण ’हर्ष नृप तो सर्वांमुखीं येतसे;
कांहीं सत्कविही पहा अलिकडे राजाश्रया पावले,
न स्वातंत्र्य मला उपाय नुरला दारिद्र्य–तापानलें. ९

**गो**सावी यति आणि भिक्षुक जणों ही सर्व भृंगावली,
**यां**हीं कीर्ति सुगंध दूर पसरे ही योग्यता आपली;
**चे**ष्टा सर्व सुधारकांत शिरल्या त्यांचें न वारें तुह्मा,
**प**ट्टा बूटहि कोट पाटलुण ती चष्माहि लागे अम्हां. १०

**दी**र्घोद्यान सुमंदिर स्वभवनीं त्या चंद्रशाला बऱ्या,
**हीं** सारीं मजला गमे रचियल्या कीं सौख्यशाला खऱ्या;
**कां**हीं न्यून तुह्मा दिसे नच अहो **गंगाधरा!** या महीं,
**व्य**क्तिप्रीतिहि जोडुनी सुखविलें हें **सावदें** ग्रामही. ११

**कु**क्कूटध्वनि ऐकुनी न उदया पावे नभीं तो रवि,
**सु**श्राव्य द्विजगान सर्व करुनी प्रेमें तयातें स्तवि;
**मां**दारावरि भृंग जाउनि बसे तो बोलवीना तया,
**ज**न्मे वाग्वधु जी मदीय कविता ये तोषवाया सया ! १२

**लि**प्तालिप्त चराचरीं निवसला जो आत्मरूपें भला,
**वा**रूनी भय भक्त–रक्षक अशा नामें जगीं शोभला;
**ही** सारी रमणीय सृष्टि रचुनी तीतें सदा भूषवी,
**ली**लेनें पुरवो अभीष्ट अपुलें **दुर्गाप्रसाद** स्तवी. १३

# कविता.

## द्रुतविलंबित.

सु—कविते ! कवि ते दयिते ! तुला
सजविती करिती अतुला तुला;
मज न ये विनये ! कवि—सत्कृति
मति मुळीं न धरी कवनीं धृति. १

समुदिता उदिता विधुता[1] जशी
करि सुधा—वसुधा बहुधा तशी;
कवि—मुखीं सुमुखी ! उतरी तरी
रसिक—अंतर नंतर मंतरी. २

यमक—हार विहार करीतसे
मधुनि वर्ण—समासमही तसे;
नव—विभूषणिं भूषवितां अशी
सुर—वधू दिसते कविता जशी. ३

रसिक—चित्त—विहारिणि मानिनी
चलित—नूपुर—घोष मृणालिनी
रचित मंजुल वर्णपदान्विता
सुकविता कविताप हरी स्वतां. ४

सरस[2]—भाववती सुदती सती
रुचिरता मग ये मुदतीस ती;
सकळ तें कळतें मन मानतें
मजसि साध्य अहा ! परि कां न तें ? ५

---

१ चांदणें. २ उत्तम भाव दाखविणारी.

मदधुंरां[1] मधुरां ललनाधरां
विरहिं चिंतित जेविं बसे घरा;
सुंकविते[2] कविते ! स्मृति अंतरीं
अदयते तुज काय ह्मणूं तरी ! ६

न करिं कोप, न कोपन हें बरें,
सदयता धरिं ताप हरीं त्वरें;
कमल–कोमल–लोलल–लोचने !
अलि मलीन विलीनहि साहणें. ७

न भवभूति विभूति विलोकिली
कविगुरूतनु तेंवि विलोपली;
मदनबाणचि ‘ बाण ’ कुठें तरी
रसिकचित्त समाकुल जो करी. ८

“ कुहु कुहू ” करि कोकिळ ‘ माघ ’ तो,
कवन–आम्र–सुमंजिरि मागतो;
हृदयिंचा तव हर्षचि ‘ हर्ष ’ तो
तव तनूवरि बाष्पचि वर्षतो. ९

ललित–वर्ण मुखी शुक ‘ दंडि ’ तो,
कवि–विभूषणि ! भूषणिं मंडितो;
विजय दे, ‘ जयदेव ’ हि देव ज्या,
उपवनीं पवनीं रमला तुझ्या. १०

वद, सती असती कवि हे कुठें ?
बघुनि यत्कृति मन्मति लोपते;

---

१ मदानें धुंद ( प्रत्ययाभावी द्वितिया. ) २ क्रियापद.

सुचिर[1] खेळुनियां महिमंडळीं
रुचिर[2] गेलि कुठें कवि-मंडळी ? ११

सजवुनी करुनी तुज सुंदरी
वसत भूवरि कीर्ति-सुमंदिरीं;
असति होतिल आणिक ते जरी,
तरि तदीय कुणास न ये सरी. १२

न तसा कविसा तुज वाटतो,
विरह हा अहहा ! हृदिं दाटतो;
विरमलें रमलें विमले ! मन
कलविभाषिणि सोड मधुस्वन. १३

कवळिला वळिला मलयानिल,
मग मला गमला प्रखरानल;
उमजला मजला नव बोध कीं,
" कठिण काळिं सुधाहि विषास वी !" १४

प्रकट भावहि अप्रकटीं वसे,
सतत हांसत सांगत तूं असे;
गजगतीं जगतीं बहु गूढता
उकलली कविलीनवती ! स्वतां. १५

बुधजनीं विजनीं बसलों जरी
घडि घडी तुज आठवितों तरी;
मन विलक्षण लक्ष न ठेवितें
तुजसि निंदुनि काय तरी असें. १६

---

१ फार वेळ. २ सुंदर.

जगिं चराचरिं मी वसतों इथें
मजसि सोडुनि जाशिल तूं कुठें ?
अहह ! काय उभी जवळी असे
बरळलों मग काय तरी असें ? १७

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

## कवि—काव्य—वृत्ति.

### तोटक.

सहज एक कवी अवलोकिला
रचित जो कविता नव बैसला;
प्रथम तत्कृति—चार विलोकुनी,
नवल तैं गमलें मम या मनीं. १

रचित वाक्य असे, जुळवीतसे
यमक, वर्ण—समासमही तसे;
गुणगुणूनि, विपण्ण पहूडला,
कवि भला थकला दिसला मला. २

खडबडूनि उठूनि, लिहीतसे,
अडखळूनि मधेंच पहातसे;
निटिल तें स्व—करीं मग ठेवुनी
विरहि—सा बसला टक लावुनी. ३

क्षणिं सुचित्त, सचिंत दिसे क्षणीं,
हनुवटी—तटिं ठेवुनि लेखणी,
मुकलितोन्मिलितें नयनें करी,
रमण वाग्वधु आठवि अंतरीं. ४

घडि घडी उघडी, घडि घेउनी,
बघुनि वाचुनि हर्षित हो मनीं;
‘ स्वकृति—भूषण तें न गमे उणें,
उगिच नांव कशास्तव ठेवणें. ’ ५

सहज लेखनवस्तुंस ठेवुनी,
यमक चिंतित हा बसला मनीं;
फिरुनि जों बघतो गवसे न ती !
असुनि सन्निध शोधि सभोंवतीं ! ६

अहह ! भूक तहान सुचे न ज्या !
कुठुनि सोंगटि तीं बिझिकें तया ?
वदति बालिश, बालिश हे तुला !
न गणुनी बुझुनी तव हेतुला ! ७

तव अशी कृति पाहुनि, हे पिसे
वदति कीं, भरलें तुजशी पिसें;
किति असे जगतीं न कळे खुळे !
मति तिरस्कृति दाविति आगळे ! ८

बकुलपद्मसुमावलिच्या परी
कवन–पंक्ति तुझी न कुणा हरी ?
मधु–वनीं मधुपें अवगाहितां,
पिकचि हर्षभरें करि कूजिता. ९

करिं सुहार सुमें अजि गुंफुनी,
रसिककंठिंच घालिं तया जनीं;
अरसिकें जरि दोषमिषें कुणीं
लपविला, नच गंध लपे जनीं. १०

पळभरीं घडला तव संग हा,
व्यसन हें बरवें जडलें अहा !
स्थिति तुझ्यापरि ही मम जाहली,
ह्मणुनि लेखणि तूर्तचि ठेविली ! ११

## लतिकेस.

### तोटक वृत्त.

लतिके! कुतुकें निरखूनि तुतें
गमतें कवितें कथि तेंच इथें;
जगतीं किति रूपवती असती
उपमा परि त्यांस तुझीच सती! १

सुमनें सखिनें मम गुंफियलीं,
सुमनें कितिदां मज अर्पियलीं;
सदये! हृदयें प्रणयीं रमलीं
उपकाररती तव फार भली. २

तव पर्णतती सगळी गळली,
कृशता जणु दैवगती फिरली;
समता जगतांत नितांत सदा
नसते! वसतेच सुशांत कदा. ३

रसभंगबळें तव भृंग पळे,
पिक तेंवि वळे, शुक त्याचमुळें;
सुखिं येति[1] घरीं, विपदीं न परी
विपरीत अशी जनरीत खरी ४

तुज भूषवि जो बहु तोषवि जो
मधु[2] बंधु खरा तव माधवि[3]! तो;
नवपर्णवती! नच वर्णवती
तव भाग्यकथाहि सुवर्णवती! ५

१ जन. (कर्ता). २ वसंत. ३ माधवी लता.

हर–संगरिं जो स्मर–साह्य करी
पण पूर्णपणें हर–चित्त हरी;
मधु–[१]माधविं ये, मधु माधवि ! गे !
नटली सजली ह्मणुनी सखये ! ६

नव कुंजवनीं तुझिया शिरलों
फिरलों सुमगंधभरें रमलों;
दलयुक्त अशी कलिका खुडली
मम बुद्धि कशी न कळे चळली. ७

गळती तव दोनचि अश्रु तयीं
चरका बसला मम या हृदयीं;
लव कोप तुझा दिसुनीहि न ये
स्वमनीं बहु मी अवमानुनि घे. ८

मुळिं येउं नये, परि येइ सये !
जन मूर्ख असा तव गेहिं बये !
प्रणती वरितों विनती करितों
वद ? याहुनि अन्यहि आचरितों. ९

ललिता लतिकावलि या फुलल्या
हरितांबरिं वेलबुटी चढल्या;
पवनें बहु तूं परि कष्टियली
सहकारकरीं परिवेष्टियली. १०

प्रियकंठिं मिठी दृढ घालुनि गे !
गुजगोष्टि किती करिशी लतिके !

---

१ चैत्र वैशाखांत.

वरतीं वरतीं मुख जाइ तुझें
प्रणयांतिल हेतु कुणा न कळे ! ११

तव मंद सुगंध सबंध वनीं
सुटला–फुटला घट काय ? झणीं;
बहु दंग विहंगम–वृंद मनीं
कलशब्द उठे बघ सर्व वनीं. १२

कुसुमें गळलीं नव भूमितळीं
अलिपंक्ति तयावरती रमली;
सुममंद मरंद गळेचि बळें
भ्रमराविण तो कवणास मिळे. १३

नवजीवन जीवन हेंच तुझें
नच काननिं संतत तेंहि मिळे;
परि नाहिं कधीं रुसली फुगली,
निजकार्यिं तशी न कधीं चुकली. १४


सहकारतरू सहचारि जिचा
सहवास करू सुखकारिणिचा;
सहजासहजीं जरि गांठ पडे
वदतात "अलभ्यचि लाभ घडे!" १५

वनदेवि खरी, मज देइं तरी
तव शांति हृदीं मम या वितरीं;
उपदेश तुझा अति मुग्ध असे
नुमजे मजसी करुं काय कसें ? १६

शिकवी तव जीवन बोध खरा
करुं निश्चय कांहिं तरीहि बरा;

वदणें नलगे कृति ती करणें
न तरी मग व्यर्थ असे जगणें. १७

बहु सार जिथें सहकारलते!
रमतात सुखें कवि सर्व तिथें;
बहुतांपरि म्यांहि तुला स्तविलें
सरलें मम काव्य तुला वहिलें. १८



## काव्यरत्नावलीचा अंक पाहून.

### वसंततिलका.

आलासि काय सखया ! मज भेट द्याया
घेऊनि काव्यकुसुमें नव तोषवाया ?
तूतें सुहृत्स्थिति उदास कशी कळाली ?
कीं योग्य वेळिं तुज पाहुनि जी बुझाली. १

साधें, मनोहर परी बहिरंग तूझें,
श्री:शीर्षभूषण हरी शुभ, नेत्र माझे;
ज्या ह्या करीं धरियल्या नवपुष्पमाला,
तत्कांतिनें अरुण काय जणों जहाला ! २

तूं काव्यपुष्पमकरंदिं सदैव गुंग,
त्वत्संग वांछिति—अहा ! कवि—वृंदभृंग;
देती तुझ्याजवळ आणुनि ते रसाला,
सर्वांस तोषवुनि साधिशि सद्यशाला ! ३

सन्मित्र तूं अससि बा ! रसिकाजनांचा,
येशी गुलाल उधळीतचि सद्रसांचा;
देशी सुरम्यकवनाग—सुमावली त्या,
मासांतरीं निज-सुगंध-युता अशा ज्या. ४

हें सर्व सत्य, परि आज अहा ! गड्या ! त्वां
तीं कोणतीं नवसुमें वद आणिलीं ? बा !
कीं यत्सुगंधभर तोषवितो मनाला,
जो न्यून लेश न गमे, कविसज्जनाला. ५

सारीं विचार करुनी बहिरंग हातें,
हो ! अंतरंग बहुरम्यचि दृष्ट मातें !
हा काव्यपुष्पचय दाटुनियां सुमंद,
वाहे मरंद, सुटला जणुं अर्थगंध ! ६

कीं हे विशुद्ध जलनिर्झर वाहताती,
अर्थांश सद्रस तयांत तरंगताती;
ये वर्ण रम्य बहु चित्रविचित्र जेणें,
त्याची चवी मधुकराविण कोण जाणे ? ७

कीं शारदा कनककुंभ धरूनि हातें
आलासि तृप्त करण्या रसिका जनातें ?
ह्या पाहुनी तव अहैतुक–सत्कृतीतें,
संतोषती–बुध समस्त महामती ते. ८

कीं ह्या बकूलनलिनीतरुपुष्पमाला,
ठेवूनि त्यांमधुनि आम्रसुमंजिऱ्याला
घेऊनि येशि सदया ! हृदयीं धरून !
मत्कंठ सद्गदित होउनि ये भरून ! ९

मैत्रींत सौख्य वसतें, न दुजें कशांत,
हें तत्व पूर्ण भरलें तव मानसांत;
स्नेहार्द्रता मजशि ही तव लाजवीते,
विद्यासमन्वित तुझे गुण दाखवीते. १०

सत्संग जो निशिदिनीं घडतो तुला, बा !
तो सद्गुणाविण जगीं सहजीं मिळे कां ?
येऊनि सद्रस उभे कर जोडुनीयां !
तूं स्वर्गसौख्य उपभोगिशि भूवरी या. ११

# उखाणें.

[ चालः—चंद्रकांतराजाची० ]

**पद.**

तुझीं उखाणीं बहुत जिंकिलीं जिंक सखे माझें !
प्रथम कथा ? प्रियकरा घरीं कीं बाहेरी आहे ? १
इथेंच होतें कोणीं नेलें मला न कां पुसिलें ?
प्रिया ! काय मुखवस्त्र आपुलें ? छे ! नाहीं सुशिले! २
चंचल परि जें स्थीर जहालें आनंदी दिसलें
'मृग—बालक' हें आहे येथें, नाहीं ग विमले ! ३
प्रथम निरीक्षण करितां मातें मद्रूपचि दिसलें
कनकपात्र जलपूर्ण इथें हें आहे भरलेलें. ४
तुझ्याच योगें रुचिर भासलें तुलाच दिसत निकें,
बळें स्तवितसां, असेल मन्मुख—भूषण, तेंहि न गे ! ५
आलों तेव्हां होतें परि तें आतांची गेलें !
कां दादाचें पत्रचि होतें ? नाहीं ग चपले ! ६
तुलाच ठावें असे परी त्वां पाहिलें न त्यातें;
होतें मन्नव भूषण कां ? तें ? मुळिंहि न तें कांतें ! ७
तुझेंच ज्यातें वेड लागुनी वेडावुनि जाई !
नसे योग्य मी, असें काय ? तें असेल तरि बाई ! ८
तुवांच हरिलें प्रिये ! जयाला तुझेंच तें होतें !
पुरे गौरव प्रेम आपुलें या दासीवरचें. ९
तुलाच होतें पुरें ठाउकें तुवांच तें नेलें !
उगाच घेतां आळ मजवरी खरेंच गे ! सगळें. १०

जयास येई बहुत रुचिरता रंगहि तो बरवा
आतां कळलें, असेल माझा शाल्ू तो हिरवा. ११

सजीव ह्मणुं; तरि दिसे न मातें निर्जिव परि नाहीं,
असेल का मद्रास्यावरची कोटी अपुली ही? १२

सखे! सखे! तें तेजोमयही सजल असे पाहीं!
काय! तरी मन्नामाचें हें वेड तुझा बाई! १३

विश्व सांठवी पुन्हा आठवी तयांत तें भरलें
कसें उमगणें गूढाहुनि हें प्रिया! गूढ झालें. १४

विश्वाची ही एकतानता तयांत भरलेली,
कविता देवी असेल आतां अपुली उरलेली. १५

विश्वपर्यटण पळांत करुनी जिथें तिथें राहे!
काव्य–कल्पना असेल बहुधा मैत्रिण दुसरी हे. १६

काव्य–कल्पना–सृष्टीमध्यें दंगचि जें होतें,
असेल मग का? प्रिया! आपुलें शुद्ध चित्त हो! तें. १७

प्रेमतरू हालवी प्रियेचा गुप्तचि परि राहे,
तुमचें असलें चित्त खरोखर ओळखिलें म्यां हें. १८

तुझ्यावांचुनी प्रेमरूप ज्या अन्य नसे कांहीं,
शुद्धांतर मीं प्रथम कसें तें ओळखिलें नाहीं. १९

विजयी झाल्यें बक्षिस देणें अमोल मज नाथा!
कंठिं मिठी घालुनी पहुडली मांडीवरि कांता. २०

कमलमुखीचें चुंबन घेउनि तोषविलें तिजला,
प्रेमभरानें पाहत होती टक लावुनि मजला. २१

# मित्र–विरह.

## श्लोक.

ज्याच्यासवें सकळ शैशव घालवीलें,
एकांतिं भावि–भव–मंथन फार केलें;
त्याचें असें निधन पाहुनि, अंतरंग
पोळूनियां, उठति त्यावरि हे तरंग. १

बा! सन्मित्रा! त्यजुनि मजसी सांग गेलासि कोठें?
कोठें पाहूं? नच मज सुचे! अंतरां दुःख दाटे!
दुःखाची ती सरुनि रजनी, सौख्य–भानू उदेला,
तों दैवानें कपट करुनी राहु–सा घात केला! १

आनंदानें तुजसह सख्या! खेळलों खेळ भारी,
त्याचें होतां स्मरण पडतें चित्त नाना विकारीं!
त्वत्संगानें सुख–द दिन जे भासले मन्मनातें
गेले कैसे निघुनि? मनिं मी आठवीतों तयांतें. २

वेळोवेळीं कलह अपुला जाहला जो स्वभावें,
कां सन्मित्रा! मजवरि गड्या! कोपशी त्याचि योगें?
ऐसें मानूं तरि नच शिवे कल्पनाही मनातें,
कीं तें सारें सहजचि घडे, जाणसी तूं तयातें. ३

मीं चित्तींचें हितगुज तुला सांगतां शांतवीशी
हेतूमाजी मम मन कसें नेटकें गुंतवीशी;
जाई मातें सुखद बहु तो काल चित्तापहारी!
हा! ती गेली अजि तव सख्या! आकृती सौख्यकारी. ४

जैसा मातें हितकर सखा तूं, न तैसा तुला मी,–
जाणूनी कां कपट करुनी, होशि गा ? स्वर्गगामी !
कैसें व्हावें तुजकडुन हें ? साच वाटे न मातें
"जाणें येणें सकळ जगतीं इच्छितां काय होतें ?" ५

ये, ये, जाऊं उठ चल सख्या ! पाठशाळेंत आज,
वाटे शून्य प्रिय मम जिथें तूं न तोही समाज !
किंवा जाऊं चल उपवनीं, मौज तेथील पाहूं,
आनंदानें क्षणभरि तरी बोलुनी, शांत होऊं. ६

मातें तूं मी तुज न बघिलें कार्यभावें क्षणैक !
आतां होतें भ्रमित मन ! हें साहणें केविं दुःख;
येऊनीयां इह तरि अहा ! भेटशी काय मातें ?
साहेना हा विरह मजशीं ! पोळवी मन्मनातें ! ७

हा ! हा ! जाती मनुज जगतीं, भेटती कां फिरून ?
आह्मी वेडे उगिच रडतों सद्गुणां आठवून;
जा, जा, व्योमीं मज बघुनि कां कष्टवीशी मनाला ?
देवागारीं गमन करण्या वाटतो वेळ झाला. ८

ज्या हस्तातें धरुनि करिं मीं पाहिली नंदन–श्री,
ज्यानें बोधामृत विनवुनी पाजिलें त्या मुखासी,
ज्या त्वन्नेत्रें कठिण समयीं गुप्त संकेत केला
हा ! हा ! काष्ठासमचि जळतां पाहतों मी तयांला ! ९

वाग्वृक्षाचें नव–सुम तुला आवडे हें मनांत
आलें, द्याया उचित दुसरी वस्तु नाहीं जगांत;
यासाठीं बा ! मम संवगड्या ! "काव्यरत्नावलींत"
गुंफूनी दें तुज दश–सुमें प्रेम–गंधाभियुक्त. १०

## शारद–श्री.

### पृथ्वी.

विशुद्ध जल निर्झर स्वन–भरें सुखें वाहती,
तडाग–सरिता–तटीं विहगवृंद हे पोहती;
सरोज–कुसुमें नवीं सुखद हीं फुलूं लागलीं,
सखे ! हंसत ये जणूं रुचिर शारद–श्री भली. १

सुपल्लव–युता लता नयनरम्य ह्या जाहल्या,
शिरीं कुसुम–गुच्छ ठेवुनि जणूं सख्या पातल्या;
परस्पर पहा ! पहा ! दृढ मिठी कशा घालिती,
नसे प्रणय–बंध तो उकलितां कुणाची क्षिती. २

सुगंधयुत वायु हा करि प्रियांस रोमांचिता,
सशीत उपचार त्या त्यजिति त्यामुळें सर्वथा;
करी मदनदीप्ति तो हळुहळू युवाभ्यंतरीं,
कुणास दिन हे सखे! सुख न देति गे! अंतरीं. ३

तृणांकुर नवे बहू डुलति काननीं हे इथें,
पहा ! मधुनि नीरही झुळुझुळू कसें वाहतें;
समान सिकता कुणीं पसरली इथें ही बरें,
निसर्ग सखि खेळली खचित शेष हा तो उरे. ४

सुरम्य मृग–बालकें सुखभरें बहू हिंडलीं,
तदीय चरणाकृती उमटली पहा या स्थलीं;
" कुठें तरि कुठें " नको वदुं–हळूच तीं हीं पहा !
मृगें चकित गे! तुलाच बघती मृगाक्षे ! अहा ! ५

प्रफुल्ल तरु जाहले रसिक भृंग त्या सेविती,
गळून पडती सुमें रुचिर जागजागीं सती;
प्रिये! सुवनदेविच्या असति रंगवल्लीच या,
पहा! दुरुनि मौज ही परि न हात लावीं तया. ६

तृणें हरित त्यामधें विविध पुष्पचित्रावली,
स्वकीय कर कुंचली धरुनि सूर्य हा रंगवी;
असे क्षितिज ही मिती, कृति अशी न ये मानवा,
कुणीं पसरिला बरें हरित गालिचा हा नवा. ७

सरीं भरुन राहिलीं विकच पद्मपुष्पें किती,
किती मधुप हंस सेविति नसे तयांची मिती;
सुधाघटचि काय हे अखिल देव संप्राशिती,
कळे न मज काय कीं सकल स्वर्ग ये खालतीं. ८

तृणावरि चहूंकडे सलिलबिंदु जे सांचले,
खरींच वनदेविचीं असति काय मुक्ताफलें;
किती चरण आपुले भिजुनि आर्द्र झाले प्रिये!
असेल सखिचें तुझ्या प्रथम काय आतिथ्य हें? ९

अहा! कुठुनि येतसे श्रवण मंजु गोड ध्वनी,
हरी सकल ताप जो रमवि तोष देई मनीं;
बघूं चल सखे! बघूं अहह! काय पर्णध्वनि,
खराच वनदेविचा मधुर हाचि वीणाध्वनि. १०

बसूं क्षणभरी इथें स्थल निवांत हें भासतें,
तुझ्याजवळिं निर्झरा रुचिर शांतता नांदते;
अखंड जल–निर्गमें सकळ विश्व हें बोधिशी,
“गुणास न वय प्रमाण” निज तत्त्व हें दाविसी. ११

चराचरिं जिथें तिथें प्रणय पूर्णता पावली,
कुठून मग ती वसे विरुनि जाय तापावली;
असंख्य जइं प्रीतिच्या सुमलता डुलूं लागती,
तदीय कुसुमें अशीं पसरतीं जगाभोंवती. १२

उरोजवसनास सांवरित ज्या बहू लाजल्या,
प्रसन्न सरितातटीं तरुण सुंदरी पातल्या;
हळूच वदती मुखीं मधुर हांसती पाहती,
वरूनि सुरदेवि ह्या उतरल्या जणों खालतीं ! १३

प्रभातसमयीं स्त्रिया करुनि मार्जनादिक्रिया,
स्वकंकण–रवें सडे कितिक घालिती सुप्रिया;
सुहास्य–ललना गृहापुढति रंगवल्ली नव्या
सुरम्य जणुं रेखिती कनकरौप्य ताराच या ! १४

नभीं विहगवृंद हे विहरतां बहू भागले,
तरू–शिरिं मुदें विशंकित मनें पुन्हा बैसले.
तिरस्कृति न जाहली, मधुफलें तयां लाभलीं,
जडांत उपकारता दिसुनि नित्य येते भली ! १५

## *जिजाबाईंचा पुत्रविरह.

### वसंततिलका.

कारागृहीं धरुनि भूप शिवास टाकी
तो चित्तकंटक असा उपटोनि टाकी !
भृत्याननें सकल ऐकुनि त्या कु- वृत्ता,
शोकीं निमज्जन करी; शिवभूपमाता. १

त्या म्लेच्छ–पार्थिव–गृहीं नच जाइं पुत्रा !
ऐसें किती कथियलें तुज, तानु–मित्रा !
कैसें करूं? तुजसि पाहुं कुठें तरी रे !
मत्प्राण साहति तुझ्या विरहा न बा रे ! २

आहेस कीं सजिव तूं मम सत्सुता हे !
मन्मानसीं उठति तर्क विचित्र बा हे !
तो दुष्ट भूप तुज काय करील बाई !
सांडीन देह जरि का भलतेंच होई ! ३

पाहूनि मी तुजकडे पतिदुःख सारीं,
तों पुत्र शोक-मय पात्र कुदैव सारी ;
शंभूहि तो तुजसवेंचि विचित्र योग !
दैवा ! कसा मजवरी धरिलास राग ? ४

कीं भोंसले–कुळ समूळचि नष्ट होणें
इच्छा प्रभो ! तरि असे तव काय ? नेणें !

---

* श्रीशिवाजी महाराजांस औरंगजेबानें कैदेंत टाकलें, हें त्यांच्या मातुश्रीस कळल्यावरचा हा प्रसंग आहे.

प्रार्थीं परी तुजसि जोडुनि हात दोन्ही,
आह्मां कुणा न विरहाग्नित दे त्यजोनी. ५

अंबे ! तुझा सुत असा पडतां विपंकीं
निद्रा कशी तुज बये ! रुचली स्वलोकीं ?
त्या रक्षुनी, अफजुलास तुवांच आई !
तैं मारिलें अजि न धांवसि काय बाई ! ६

आले प्रसंग बहुधा परि हा विचित्र !
माझा असेल जरि भाव खरा पवित्र
आणूनि भेटव क्षणीं; बहु आतुरा मी
नामी उपाय गढणें तुझिया सुनामीं. ७

कैंचा तिथें कुशल तूं शिव ! लोकपाळा !
गेल्यास काळगुहिं, फोडिन मी कपाळा !
आकर्षिती मन तुझे गुण ते स्मरून—
आत्मा बहू तळमळे ! ह्रद ये भरून ! ८

कांता तुझ्या विरह-सागरिं ह्या बुडाल्या !
तैशाच ह्या मम शिवा ! स्मृति गा उडाल्या !
हें राजमंदिर तुझ्याविण शून्य सारें !
तैसेच भृत्य विमनस्क समग्र बारे ! ९

तानू ! अशा व्यसनिं तूं करशील काय ?
येऊन भेट मजशीं शिव तूं न काय ?
ठेवीन काय तरि मी विरहीं पडेना,
दु:सह्य—दु:ख—निकराग्नित सांपडेना. १०

गो—विप्र—भूस्तव जया बहु पीडियेलें,
त्या नीतिशून्य यवनें तुज कोंडियेलें !

आतां कसा तुजसि सोडिल बा ! कुधी तो ?
हें जाणुनी, विकल काय न काय होतो ? ११

नाहीं तुझे पुरविले प्रिय संभु ! कोड !
तों म्लेच्छ—घात पडला अजि हाय आड !
हें पूर्वजन्म--कृत दुष्कृत सर्व काय ?
त्वज्जन्म व्यर्थचि गमे मज हाय ! हाय ! १२

सौंदर्ययुक्त तव ती तनु रूपवंत
पाहूनि मी मनिं गणीं मज भाग्यवंत;
ऐशी तुझी स्थिति कळूनिहि दुर्बला मी
होत्यें विदीर्ण ! पडतें मज कोण कामीं ? १३

स्वातंत्र्य—सौख्य तुजशीं न मिळे कधींही
आतां स्वकीय—जन संगति ती न होई !
हें काय राज—सुख ? काय प्रपंच—सौख्य ?
कैंचें घडे तुज शिवा ! प्रिय तानु—सख्य ! १४

तूं तात—मृत्यु—समयीं जवळी न बाळा !
माझ्याहि वेळिं नसणार अहा ! कपाळा !
किंवा प्रभो ! बहु तुझे अपराध केले
आह्मीं ? ह्मणून असलें फळ हें मिळालें ! १५

हे चंडिके ! तुजसि येइ न काय माया ?
धांवें; तुझ्याविण नसे व्यसना हराया !
आधार तूं, बसशि केंवि उगीच माते ?
कैसें रुचे तुजसि हें त्रिपुरारी—कांते ! १६


शोकीं निमग्न असतां, दिन पूर्ण गेला ,
निद्रा नये निशिं तदा बहु विव्हलेला ;

मृत्यू बरा, परि सु—पुत्र—वियोग भारी
होई मना, खचित तो अति दुःखकारी. १७

तो उत्तरीय—पट—पल्लव आर्द्र होई !
नेत्राश्रुतें पुसुनि नेत्र कपोल हेही—
ताम्र स्वरूप धरिती ! स्वनही फुटेना !
त्या म्लान दीन वदना अवलोकवेना ! १८

"सोडीं सोडीं विरह सखये ! खेद हा कासयासी ?
मद्भक्ताला व्यसन कसलें मत्कृपा होय त्यासी;
आणूनियां निज जन शिवा तोषवीं; भेद नाणीं
चित्तीं—"स्वप्नीं हिमनगसुता हें कथी सौख्य खाणी. १९

प्रातःकाळीं जननि सकळां जाणवी ती सुवार्ता ,
वर्णावा तो हरिख किति तें होय पीयूष आर्ता !
धर्मत्राणा उदित असल्या जो शिवांशासि दापी ,
ऐसा प्राणी महिवरि सुखा भोगिना हो ! कदापी. २०



# माझी कहाणी.

## श्लोक.

आले कोणी मजसि बघण्या वृद्ध श्रीमंत एक,
बाबासंगें हळुच करिती गुह्य गोष्टी अनेक;
लग्नाचाही नियम ठरला पत्रिका कोण पाही,
आई "नाहीं" ह्मणत असतां चाललें नाहिं कांहीं. १

गांवामध्यें सहजच सुरू जाहले लोकचार,
जातां देवालयिं मज बहू हांसती लोक चार;
कोणी कोणी मजसि बघुनी "शारदा" बोलती ही,
मी तें आईजवळिं कथितां दीन ती बापुडीही. २

स्वकीय जन टोंचिती, इतर सर्वही हांसती,
क्षिती न परि अंतरीं जननि फार सांगे सती;
अहा! कुपित जाहला जनक "मूर्ख सारे" ह्मणे,
कितीक जगतीं असे असति ना कळे शाहणे! ३

जरी असुख-वन्हि हा प्रबळ पेटला अंतरीं,
कुणाजवळ सांगणें मन सलज्ज होतें तरी;
कुठें स्मरगता महा जरठता कृतांतांकिता,
कुठें स्मरयुता असे तरुणता सदालंकृता. ४

कैचें लग्न स्वकिय तनुची धिंड झालीच पूर्ण,
अश्वीं आह्मां बघुनि हंसती, मी हृदीं होय चूर्ण;
बंदूकांचा ध्वनि उसळतां अश्व जेव्हां बुझाला,
तेव्हां मात्र स्वजनमानिंचा हर्ष सारा गळाला! ५

वरी मी, ते खालीं, वर कण्हत मागे जल झणीं,
फणी दंतांची कृत्रिम गवसती ते वरमणी;
पुसोनी फुंकोनी बसवि पगडी शीर्ष—कमलीं,
पुरी झाली यात्रा परि न थरकी पूर्ण शमली. ६

"सतीला सन्मान्य स्वपति" ह्मणणें हें जरि खरें,
तरी कां वर्षायू वर निवडणें आप्त—निकरें?
कुठें गेले वेद स्मृति—वचन सारे सुजन ते,
न तेव्हांचीं कार्यें तुजकडुनि हो, आर्यजनते! ७

कसा बाल्यत्वाचा सुखद दिन सारा अपसरे,
अहा! दुर्दैवाची भयद रजनी कृष्ण पसरे!
मला नेणें झालें इकडुनि गृहीं येउनि स्वयें,
स्वयें सारी वृत्ती बघुनि चरके मन्मन भयें! ८

अहा! श्वश्रू आणि श्वशुर दिर जावा न दिसती,
घरें दारें शेतें परिजन न दृष्टीस पडती;
कुठें कैसे मासांतचि सकळ गेलेत न कळे!
कळे—लग्नासाठीं अनृत वदणें होय सगळें. ९

गेला सारा कलप निघुनी पांढरे केंस आले,
दंतांचीही फणि हरपली बोळकें तोंड झालें;
वार्धक्यानें पिडित तनुनें यष्टिकाधार केला,
कन्येचा हा क्रय तव पित्या! चांगला हा न झाला. १०

खों, खों, ऐसा कफ दिनभरीं खेळतो फार भारी,
जो मृत्यूचा बहुत दिवसांपासुनी कारभारी;
दों हातांनीं शिर धरुनियां बोलती "आई आई!"
तोंडांतूनी सहज गळुनी लाळ खालींच येई. ११

कंथा शय्या, मुळिंच नव्हतें घ्यावयाला उशाला,
वस्त्रें माझीं शिवुनि अर्धि तीं, मानिला तो दुशाला;
भ्रांती खाया दिनभरिं, कथा औषधाची कशाला,
मातें तेव्हां गृह सकल तें जाहली शोकशाला! १२

झाला जर्जर देह पूर्ण, सरलें तैलायु सारें यदा!
प्राणज्योत हळूच काळसमिरें गेली विझोनी तदा!
वज्राघात घडे शिरीं परि मृता नाहीं कशी जाहल्यें!
"जें दैवीं लिहिलें कदापि न टळे" हें मात्र झालें खरें! १३

झाला वर्षांतचि मम अहा! पूर्ण संसार सारा!
सारासार स्मृतिहिन जया मांडिला हा पसारा;
क्षेत्रीं माझा वपन विधिचा सर्व होतां प्रकार,
दुर्दैवाचा जनकच पिता चालवी स्वाधिकार. १४

बाबांनीं धरुनी करीं दृढ मला जैं बैसवीलें तिरीं,
होत्यें क्रंदत सारखी, नच दया आली कुणाला परी!
दुःशब्दें वरि बोल बोलति, असें म्यां काय केलें तरी?
हा! तेव्हां असती करीं जरि सुरी, खोंचून घेतें उरीं! १५

पुढें मकरसंक्रमीं मम सख्या गृहीं पातल्या,
बघून मजसी किती शत विदीर्ण त्या जाहल्या!
नसे जनक हा असे कनकलोभधारी महा!
सुता सुभगता विकी यमधृता स्वतां हा पहा! १६

वाचूनी मम ही कथा सुजन हो! घ्या बोध कांहीं बरा,
कन्यादान करा, न विक्रय करा! आर्यांस त्या संस्मरा!
ह्या धेनु अबला समस्त असुनी त्यांचेंच वैडंबन,
नोहे ही प्रगती असे भयद हें अत्यंत कीं स्तंभन! १७

# गड आला, पण सिंह गेला !

## कथानक.

इ. स. १६६६ त अवरंगजेबाच्या दिल्लीरखान व जयसिंग या प्रतापी सरदारांच्या आकस्मिक स्वारीच्या वेळीं श्रीछत्रपति शिवाजी महाराजांनीं दूरदर्शीपणानें कांहीं किल्ले वगैरे देऊन महाराष्ट्रावरील तें संकट टाळलें.

त्यांत महाराष्ट्राचें केवळ भूषणच असा सिंहगड किल्ला त्यांच्या हातून गेला, याविषयीं त्यांस बरेंच वाईटहि वाटलें; पण तो प्रसंगच तसा होता. पुढें अवरंगजेबानें कपटानें कैद केल्यावर त्यांतून सुटून त्यांनीं एकदम सिंहगड घेण्याचा बेत केला; तेव्हां त्यांचा केवळ उजवा हातच असा मित्र तान्हाजी मालुसरा हा आपला मुलगा एसबा याच्या लग्नास गेलेला होता. तो त्या मुलासह व आपला मामा 'शेलार' यासह शिवाजी महाराजांस लग्नाचें आमंत्रण देण्यास आला. महाराजांची वरील कारणानें चिंतायुक्त झालेली मुद्रा पाहून त्यानें त्याचें कारण विचारिलें, आणि तें कळतांच आपल्या प्रभूकरितां, आपल्या स्नेह्याकरितां मुलाचें लग्न बाजूस सारून दुसऱ्या दिवसाच्या सूर्योदयाच्या आंत सिंहगड सर करण्याची घोर प्रतिज्ञा केली. तेव्हां किल्ल्यावर अवरंगजेबाचा उदयभानू हा किल्लेदार होता. त्यास तानाजीची ही प्रतिज्ञा कळली. तोही कांहीं कमी शूर नव्हता. तानाजीनें आपल्या सैन्याच्या दोन टोळ्या करून, एकीवर आपला भाऊ सूर्याजी यास नेमिलें, आणि त्यास किल्ल्याच्या मुख्य दरवाजावर ठेवून आपण जिकडून आंत कोणाचाहि प्रवेश होणें शक्य नाहीं अशा दुर्भेद्य तटाखालीं उभा राहिला, आणि आपल्या यशवंती नांवाच्या घोरपडीच्या साह्यानें तो सर्व मावळ्यांसह वर चढून गेला. मराठे व रजपूत ह्यांची लढाई जुंपली तींत तानाजी पडला, पण सूर्याजीनें आपल्या लोकांस उत्तेजन देऊन किल्ला सर केला.

सिंहगड शिवाजी महाराजांच्या ताब्यांत आला; पण ही गोष्ट त्यांस कळतांच '**गड आला, पण सिंह गेला**' असे त्यांचे उद्गार बाहेर पडले. हा सर्व कथाभाग पुढील पद्यांत आढळून येईल.

## गीति.

एसाजी, तानाजी, बाजी हे तीन मित्र रायाचे,
शिवभूप पूज्य मानिति रिपुमर्दनिं कधिं न जे हरायाचे. १

शिव आर्यसूर्य अपुल्या अभिनव तेजें महीतळीं तळपे,
औरंगजेब त्यातें झांकाया, राहुसा ससैन्य टपे. २

ऐशा काळीं जाई प्रियसुतलग्ना सुवीर तानाजी,
शिवभूपपाद गेहीं याया लिहितो तया ' प्रभो ! या जी !' ३

भूपा पाचाराया मातुल शेलार, एसबा सुत यां,
घेउनि गेला; प्रभुला प्रमोद झाला बघून फार तयां. ४

प्रेमें स्वांकीं बसवुनि, नृपति पुसे "आजि कासया बाला !
आलासि ? सांग झडकरि उत्कंठित जीव ऐकण्या झाला." ५

पत्रद्वारें कळलें होतें, परि गोड बोल ऐकाया
पुसतां, वदे शिशु तया "कथितों आगमनहेतु भो ! राया ! ६

करितात लग्न माझें बाबा, लग्ना तुह्मीं प्रभो ! यावें,
हा हेतु मनीं माझ्या, पुरवावें कोड, येउनी जावें." ७

" रे ! बाळ तव विवाहा येतों, जरि तूं रणांत येशील,
सांग मुला ! येउनि तूं संगरिं तरि शौर्य काय करिशील ?" ८

बोले "हो, हो, येइन तुह्मांसवें, समरिं अरिस दंडीन !
राहुनि बाबाजवळीं, खचितचि अरिगर्व सर्व खंडीन !" ९

शिशुपाद पालखांतचि दिसती, हरिजठरीं होय बालहरी,
परिसूनि तद्गिरा मनिं उठती आनंदसिंधुच्या लहरी. १०

मग शिव मातेसि ह्मणे " बसवावें यांस भोजना जननी ! "
ती वीरसू सदन्नें वाढी, लाजे जयांस अमृत मनीं ! ११

इकडे तानाजी हा सहज शिवप्रभुमुखेंदु अवलोकी,
तों स्थिति कष्टद सुचवी, व्यंकटसंकटनिधींत बुडलों कीं ! १२

उपरांग[1] शिवमुखेंदुस, सानंद चकोर केंवि तानाजी ?
हितरत विभुमन कष्टी असतां सेवक नसे सुखामाजी . १३

बघुनि वदे तानाजी " चिंता कसली करीतसां राया
गोविप्रप्रतिपालक ? सांगा मी सिद्ध ती निवाराया !" १४

" प्रेमें पुसशी सुहृदा ! " शिव बोले, " स्थिर नसे मदीय मन;
कोंडाणा गड अरि हरि, करिं तो ये केंवि होय रिपुदमन ?" १५

शिवचित्ता शांति नसे, पाहुनि जो भ्रमित जाहला फार
तो वीर सुतविवाहा उद्यत होईल हें निराधार ! १६

नरसिंह तदा वदला " उदयिक राष्ट्रध्वजा नगावरती
चढवीन ! सिंहनादें माझ्या रिपुगद रणीं न सावरती. १७

हिंस्रारावा परिसुनि निबिड वनीं भिउनि दीन भालु[2] सरे !
मी दुर्ग जरि न जिंकीं तरि पूर्वज नरकिं जाति मालुसरे ! १८

"साधीं स्वकार्य आधीं, देती बहु मोद बोल काना हे;"
भूप ह्मणे "जाणें मी तानाजी सत्य बोलका ना हें." १९

" प्रभुमन पाहूं दुःखी केंवि ? वदे वीर "कोण उरणारे ?
कोंडाण्यावरि कोंडिन खंडिन रणमद रणांत उरणा[3] रे !" २०

सज्ज करुनि कटक, पुरीं अर्धांगीसदनिं जाय भेटाया;
"दे मज निरोप रमणी ! रिपुचमुशीं आजि आजि खेटाया." २१

"संकल्प विवाहाचा असुनि, असें काय बोलतां नाथा ?
युष्मद्वाक्यें अशनी कोसळला जणुं गमेचि मन्माथां ! " २२

---

१ ग्रहण. २ प्राणिविशेष. ३ मेंढा.

तो धीर वीर बोले "बोल असे बोलशी कसे न कळे !
वीरसती ! प्रोत्साहक वाक्यें अजि लोपलीं कशीं सखये ?" २३

"न कळे आजि कसें हें मन्मानस आहवास जायातें
अनुमोदन देई ना !" ती वदली वीरवंशजा यातें. २४

"गे मत्प्रिये ! कधींहि न हा हरि अरिकरिवरा न मारून
अपयश घेउन येइल; यवन सुदुःसह रिपूंत हारून !" २५

"नाथा ! जातांच तरी, कांहीं सुग्रास जेवुनी जावें;
न कळे जेवण केव्हां मिळतें !" विनवी असें सती भावें. २६

"उल्हाटयंत्रगोलक संतत सुरक्त आहवीं, रमणी !
खाउनि ढेंकर देऊं;" वदला सप्रेम तीस वीरमणी. २७

इतुक्यांत गृहाभंवती कुशब्द टिवटिव असा करी टिटवी !
तत्काल सती पतिला ऐकाया अशुभ शकुन ती सुचवी ! २८

"जा शिवजननीसन्निध, लोटीं मद्विरहकाल, एसूतें
संरक्षीं; नयनाश्रू गाळीं न कदापि वीरसुतसू ते !" २९

वीर निघे; शिवमानस नसतां, करि भोजनाविना जाणें;
पक्षिकुशब्द जहाला ! वांटी साध्वी सुमंगलें वाणें. ३०

चमु घेउनि दुर्गावरि आला तानुज रणेच्छु नरवीर;
उदयभानु दुर्गेशा कळलें हें, सज्ज तोहि परवीर. ३१

ते सर्व मध्यरात्रीं दुर्गाखालींच मावळे जमले;
कृष्णशिलामय तट तो चढवे ना धीरवीर बहु दमले ! ३२

निकरें मग यशवंती घोरपड तटावरीच पाठविती
जाय, परी न धरी तट; निजपालकहेतुला न आठवि ती ! ३३

"यशवंती तुज म्हणती; बहुधा त्वां यश दिलें रणामाजी;
आजी अन्वर्थ असो तें!" वदला वीर, "आस ही माझी. ३४

म्लेंच्छकटकभट खटहट, नगतट भेदूनि त्यांस गडबडवीं,
आह्मां सहाय हो तूं; मी निमिषार्धांत सकल गड बडवीं." ३५

ये ती द्विवार परती, क्रोध मनीं दाटला; वदे—बोल—
" यशवंते! जरि येशी परतुनि आतां तुझें नसे मोल!" ३६

ऐसें वदूनि पुनरपि फेंकियली दुर्गतट धराया ते,
तट धरि ती तीव्र नखें, चमु झाली सज्ज रिपु हरायातें. ३७

मग नगशिखर सकळ तें प्रबल महाराष्ट्रभटवरीं नटलें,
'हर! हर! महादेव!' रव करितचि शिवभूपकटकभट उठले. ३८

रजपूतवीर जे जे सुप्त तयांवरि न घालिती भाले;
आले वदतचि अल्ला! अल्ला! हल्ला करून त्या धाले. ३९

खणखण असिगण चाले, भाले भ्रद करिति सांग तीहि तशी;
बरच्या न राहु देती धडधड, कवि काय सांगतीहि तशी. ४०

रुधिरजलमज्जनातें करुनी असि फार धडकले वरते;
अन्योन्य शस्त्रघातें तिळभर नव्हतेंच धड कलेवर तें. ४१

अतुल प्रताप दावित तानाजी उदयभानुला शोधी;
तोही अपुल्या भागा शोधित असतांचि भेटले क्रोधी. ४२

अन्योन्याक्ष तयांप्रति सुचवीती, हाच भाग, घे याशीं;
पाहूं नकोस इतरां, अनुचित शौर्यप्रताप गर्ह्यांशीं. ४३

उदयभानु बहु कोपें घेउनि तीव्रासि हाणिता झाला;
येरें चर्मे चुकवुनि, पेलुनि उरिं शीघ्र फेंकिला भाला. ४४

त्रिप्रहर समर झालें; विजयश्री तरिहि आपली माला
कोणाला घालिल, हा निश्चय करवे मुळीं न उभयांला. ४५

इतक्यांत उदयभानू फिरवी गरगर असीस धरुन करीं
धांवे तया वधाया; तों तानाजीच त्यास वार करी. ४६

तो साहुनि, उदय उलट भेदी तन्मर्म तीक्ष्ण असिघायें!
व्याकुळ झाला नरवर तरि अरिवध उठुनियां करूं पाहे! ४७

लत्ताप्रहार करुनी, उदय तिथुनि सैनिकांकडे वळला,
निजराष्ट्रकुलविभूषण दिनमणि अल्पावधींत मावळला! ४८

बहिरोजी सन्निध ये; सुरसदनेच्छू वदे "प्रिया! परिस—
मरणक्लेश नसे मज, शत्रुपदाघात जाचि यापरिस! ४९

अनुजा वद जा झडकरि 'जरि मालुसरे कुलांतला असशी!
तरि—घेईन दुर्गातें!—हा माझा पण खरा पुरा करिशी. ५०

नंतर करिं उदयाचा अस्त;' असा सांग त्यास आदेश;
मत्प्राण त्याविण न हे जाती सोडून साच हा देश. ५१

शिवभूपा सांग 'तुह्मां अंतींचें नमन घातिलें भावें;
ही तनु गतासु भेटे फिरुनि जरी सुयश लाभलें दैवें.' ५२

रे बाळ! मत्प्रिये! गे तुमचे फुटतील फार हंबरडे"—
परिसुनियां हें भाषण परिचारक—सदय—जन—कदंब रडे. ५३

इकडे दुर्गतळवटीं सूर्याजी सर्व कटक हळहळवी;
तों बहिरोजी दुःखद वृत्त तया येउनी सकळ कळवी. ५४

तो ये धांवत धांवत, दादा दादा अशाचि दे हाका;
हा काय वदेल तया? रणपटु जो त्वरित पावला नाका. ५५

इतुक्यांत सैन्य कांहीं रण सोडुनि पाठ वळवितें झालें;
प्रोत्साहन दे तो त्या जे लव रिपुरुधिर सांडुनी धाले. ५६

" कज्जलमय निजमुख हें दावाया जातसां कसे? परता!
यशवंती न तिथें ती मृत्यु तुह्मां खचित उचित या परता. ५७

बाप रणीं पडला; त्या सोडुनि असु आपुलेचि जगवाया—
जातां नृपयश दवडुनि, लोकीं निज शुद्र कीर्ति मळवाया! ५८

पूर्वज तुमचे गगनीं बघती सत्पुत्रशौर्यतेजातें;
तुमच्या पलायनें ह्या विमल सुकीर्ति तदीय ते जाते! ५९

मारुनि शिवयश रक्षूं! किंवा मरुनीच मोक्षपद पावूं!
ही वपु शाश्वत नाहीं; या, रिपुबलतेज तें किती पाहूं!" ६०

नरसिंह दमन करितां आले; अरिकरिसमूह गडबडती!
सूर्याजीस उदय तों भेटे वाचाट करित बडबड ती. ६१

क्रोधें सूर्याजी मग फोडी तद्वक्ष हाणुनी भाला,
तद्रक्तलक्त अग्रजतनु तद्रुधिरेंचि न्हाणुनी धाला! ६२

सूडासह गड घेउनि केला जयघोष सैन्यपालांहीं,
ज्वालांहीं सुचवि नृपा शुभवार्ता 'दुर्ग करग झाला' ही. ६३

आलें कटक, तयातें निरखी नृप; वीरवर न गिंवसे हो!
भूप पुसे "तानाजी कोठें मत्प्राण? कीं नगिं वसे हो?" ६४

कळतां वृत्त सकळ तें, शिवशोकासी नुरे जनीं पार,
"गड आला! पण गेला सिंह सखा! मदसु जाति हृत्पार! ६५

सखया! गेलास मला टाकुनि! हा कोप उचित का गमला?
केंवी तव युवतीला समजावूं जी पतिव्रता विमला!" ६६

तों वीरपुत्र आला, काकाजवळी सहर्ष तो गेला;
पाही कटकीं ताता; न दिसे ह्मणुनी विचारिता झाला. ६७

"काका! बाबा कोठें सांगा? दावा प्रभो! अहो तात;
कां नेत्रपटें पुसितां? क्लेश तुह्मां हे किमर्थ होतात?" ६८

ह्मणती "या तव घोषें तोषे–त्वत्तात तो नसे आज!"
परिसुनि शिशु रुदन करी! धीरहि असु गाळिती महाराज! ६९

"आई! आई!" करितचि जाय गृहीं बाळ शीघ्र धावोनी,
माय तयास विचारी रणवार्ता खिन्नवदन पाहोनी. ७०

"काका आले; बाबा नाहीं ते ह्मणति; मज न भेटति ते–
बाबा कोठें? आई, सांगें जाईन मीहि थेट तिथें!" ७१

वज्रप्रहार झाला बालाच्या परिसुनी अशा बोला,
जाय शिवाजवळ सती बोले "प्राणेश मम कुठें बोला? ७२

सोडूनि एकटी मज भक्षण केलें कसें प्रिया! बोला?
विततायोनलिकेच्या तप्त रुधिरसम विशालशा गोला? ७३

गा! नाथ! तुह्मी गेलां! अंतरलें मी तदाच सुपदासी!
दुस्तर भवनिधि तरणें उचित न मागें त्यजूनि निजदासी. ७४

मत्कुंकुमतिलक विभो! रुचला तुजला मुळीं न कां गा रे?
वैधव्य हें प्रखर गर लावितसे मत्तनूस आंगारे! ७५

एसू तुह्मां अहो! हा 'बाबा बाबा' ह्मणूनि आळवितो,
बोलावितो, विनवीतो; प्रभु तुमचे ओष्ठ कां न हालवितो?" ७६

तेव्हां सतीविलापा सीमा नुरलीच होय बहु खेद!
काल जसा जाय तसा दुःखामध्येंहि होतसे भेद! ७७

# विरहिणी.

## वियोगिनी वृत्त.

सखये ! नच लाविं हा गडे !
तनुतें चंदन–पंक दाहवी;
रमणीय उपोवनीं तरी
चल जाऊं रमवूं मना सये ! १

मधुरा मधु–यामिनी युवां
सुखदा होति बहूत त्या जनां;
मज मात्र कशा विदु:खिता
गमती गा रमणा ! तुझ्याविना ? २

मजशीं कुरवाळुनी प्रिया !
शयनीं जें वदसी न तें खरें !
तरि मत्सखिंचे सखे किती
गृहिं येती तरि कां न येशि तूं ? ३

बहु दूर गत प्रिया ! मनीं
न सहे ही विरहा वियोगिनी;
रविनें सर शोषितां जशी
शफरी व्याकुल होइ, मी तशी. ४

नलिनी अलि, हंस हंसिणी
रमती काननिं या प्रियांसवें;
सखिचें मन बर्हि रंजवी
तव काल–व्यय व्यर्थ हा गमे. ५

ललिता सुलता प्रफुल्लिता
जणुं पुष्पीं वनिता अलंकृता;
डुलती रुचिरा नवांकुरा
प्रियवृक्षांसह हर्षनिर्भरा. ६

सहकारज मंजिऱ्या नव्या
अलि—गुंजारव होई ज्यावरी;
पिक सेवुनि त्या नवांकुरा
हरिती मन्मन पंचम—स्वरीं. ७

करिती शुक सारिका सुखें
मधुरालाप उपोवनांत या;
सुमना ! मन त्यांत ना रमे
तव गान—स्मृति मात्र होइ गा ! ८

सुमगंध न हा मला गमे
हृदया तापद होइ कां तरी ?
अति शीत तुषार हे अहा !
मज संतप्तचि भासती परी. ९

वदती विधुतें प्रशांत या
मग कां तापवि हा मला बरें ?
"घडतां विपरीत सत्क्रिया
सुखद क्लेशद होति हें खरें." १०

सखया ! मजसारखीच कां ?
तव वृत्ती विकला असेल गा !
मग कां न बरें सुखें गृहीं
मधुमासींहि न येशि तूं क्षणीं ? ११

पसरूनि सुमें सुकोमल
शयना भूषविं मी सुमंदिरीं;
परि नागमन–प्रकार हा
हृदया पोळवितो क्षणोक्षणीं ! १२

मम दैवत तूं असें सया !
नलगे हें वदणेंच म्यां गडे !
स्मरुनी झुरतें मनीं बहू
कधिं भेटी घडतील ना कळे ! १३

लवतो बहु सव्य नेत्र हा
कुशली वृत्तहि ना कळे तुझें;
सहतें दिन मी मनीं कसे
तुज ह्याची कशि कल्पना असे ! १४

# वियोगिनी.

"इतक्यांत प्रवासास गेलेल्या आपल्या पतीच्या निधनाची वार्ता कोणीं तिला कळविली. जणूं विधीला तिच्या शोकरसाची परीक्षाच बघणें होती !" नंतर—

**वियोगिनी-वृत्त.**

पतिच्या निधनास ऐकतां—
कदलीच्या सम ती पडे क्षितीं;
असती जवळीं जरी सख्या
तरि त्यां सांवरली न ती सती. १

करिती जल—सिंचन—क्रिया,
कटि—वस्त्रें पवनास वारिती;
विवशा नच हो विबोधिता
बहु केले सदुपायही जरी. २

उठली परि संभ्रमें पुसे
"प्रिय आले वद काय ? कीं कुठें ?"
कळला भ्रम हा पुरा असे,
तइं सीमा असुखास ना उरे ! ३

पडली धरणीवरी पुन्हा
कबरी विस्खलिता असे जिची;
पिटिते हृदया पुनः पुन्हा
जल—धारा गळती कुचांवरी. ४

"सखया मज सोडुनी इथें
बसशी जाउनि स्वर्गिं तूं कसा ?

बघतें पथ मी तुझा इथें
न कळे काय तरी करूं बरें ? ५

त्यजिली मम मैत्रि तूं खरी
ह्मणुनीयां बहु खेद होइ हा;
कपटी बहु काल हा तरी
असु तूझे हरि, ठेवि कां मम ? ६

'मज दर्शन होइल' प्रिया !
मनिं आशा तरि होति ही परी,
न उरे किमपीहि ती अतां
दिन कंठूं वद हे कुणावरी ? ७

जल–संचय शुष्क जाहला
वद मत्स्यी जगते कशी तिथें ?
तरु दग्ध तदाश्रिता लता
'विहरे' हें श्रवणीं न ऐकिलें ! ८

पडला विधि–घात आडवा
गृह भासे मज कानना सम !
करिं अप्रिय ना तुझें प्रिया !
मग कां ही धरिलीस मुग्धता ? ९


क्षणिं कस्तुरि चंदनान्विता
हरिणाक्षी फिरली तिचीच ही;
दिसते तनु धूलि–धूसरा
कशि हा ! हा ! करणी विधे ! तुझी. १०

स्मितहास्य करूनियां तुला
गमनीं प्रेमकटाक्ष फेंकिला;

मुरडी नयनास तूं तसा
निज–संवादचि शेवटील तो. ११

गळतां कटि–मेखला मम
झणिं तूं सांवरिली कितीकदां !
रुदिता पडली सखी तुझी
उठवीशी तरि येउनी न कां ?" १२

किति शोक करील ती बरें
तिज आजन्मचि साहणें असे;
कविचें मन मात्र कोमल,
तिजसी आठवितो घडी घडी. १३



# सुप्त सखी.

## शार्दूलविक्रीडित.

झालों जागृत तैं निशीथसमयीं होती पुरी शांतता,
आकाशीं रमणीयता पसरली चोहींकडे सर्वथा;
होती सुप्त सखी विकाररहिता मत्संनिधानीं सुखें,
होतों पाहत सारखा तिजकडे मोहूनि गेल्यामुळें. १

आर्ये! सद्गुण शोभती विनयता संप्राप्त होतां क्षणीं,
सौंदर्य–द्युति त्यावरी विलसतां स्वर्गीयता ये झणीं;
हे येथें त्रयवर्ग एकवटले त्वन्मूर्तिमाजी अहा!
आली काय? सुरेंद्रशापवचनें तूं भूवरी अप्सरा! २

ह्या त्वद्गौर विशाल भालपटलीं घर्मावली ये नवी,
श्वासोच्छ्वासहि दीर्घ चालत असे निस्तेज तुंडच्छवि;
ऐसे काय बरें परिश्रम तुला झाले मनोहारिणी!
कैसा शब्द न एकही उमटतो त्वद्रुद्धकंठांतुनी? ३

कीं चित्तीं अपराध पूर्व निशिचा जाणूनियां सुंदरि!
झाली अंतरिं दुःखिता परि वसे ही शांतता त्वन्मुखीं;
नेत्रोन्मीलन एकदां करुनियां पाहीं मनोमोहिनी!
दृष्टीच्या तव दिव्य नील किरणीं टाकीं मला मारुनी. ४

आहा! काय मुखीं तुझ्या विलसतें हें हास्य मंदस्मिते!
मच्छृंगारिक कीं तुला पडतसे सुस्वप्न सुप्तस्थिते!
व्हाया मुक्त सलज्ज तूं विनविशी मद्बाहुपाशांतुनी?
आहे स्वप्न परी तुला गमतसे तें सत्य विभ्रंशिनी! ५

आले हे अलकाग्र पुष्प तरुसे होऊनियां खालती
तैसा माधविपुष्पहार विखरे हा त्वत्तनूभोंवती;
त्यांमध्यें मुख गे! तुझें बघुनियां वाटे मला कीं असें
आकाशस्थ विधूच नंदनवनीं विश्रांति हा घेतसे! ६

हें येथें बघ तंतुवाद्य सखये! आहे तुझें ठेविलें
ज्याच्या रम्य सुरांत त्वां कितिकदां मच्चित्त संतोषिलें!
तें घे, ऊठ, करांत, पंचमरवें तूं कोकिळा जागवीं
तीही साथ करील गे! मग तुला वाणी सुधा माधुरी. ७

गानारंभिं निजांकिं ठेवुनि विणा बिंबाधरे! गाशिल
जाणोनी मुखसाम्य हा शुकहि गे! उंचध्वनी काढिल;
भ्रूभंगान्वित नेत्र पाहुनि तुझे ही गानलुब्धा मृगी
सोडोनी तृण येउनी तुजपुढें राहील मोदें उभी! ८

साध्वी! हा तव उत्तरीय पट ये पीनस्तनाधःस्थलीं
श्वासोच्छ्वास सुदीर्घ चालुनि सुटे त्वत्कंचुकीग्रंथि ही;
पर्यंकीं वळतां, कुचद्वय तुझे संलग्न होती अहा!
पाहोनी मजला गमे समसमा कीं रम्य संयोग हा. ९

हा तारापति मोहुनी तुजकडे पाही गवाक्षांतुनी,
जेणें कांतवियोगिनी झुरविल्या कित्येक संत्रासुनी;
झाल्या ज्या सुपतिव्रता जगतिं या तूं त्यांतली एक गे!
जारांच्या कृति ह्या न ठाउक तुला रम्य प्रसन्नानने! १०

तों स्वाभाविक हो प्रबोधित तदा मच्चारुगात्री सखी,
वेगें सांवरुनी उरोजवसना खालीं उभी राहिली;
निद्राभंग मधेंच काय अपुला माझ्यामुळें जाहला
नाहीं काय मुळींच आज वदणें व्हावी मला हो क्षमा! ११

देवी ! काय विशुद्ध हें मन तुझें नाहींच म्यां जाणिलें !
नाहीं प्रेम तुझें तसें अजवरी तोलून म्यां पाहिलें !
सौंदर्यातिशयें क्षणैक इतरां पाहून वाटे मला
'नोहे सर्वचि हेम जें चमकतें' छे ! हें न लागे तुला. १२

प्रेमाच्या लहरी विशुद्ध उठल्या ज्या ह्या मदीयांतरीं
कांते ! मिश्रित जाहल्या तव गडे ! दिव्यात्मतेजोरसीं;
तेणें त्वन्मुखपंकजीं रुचिरता जी ये मनोमोहिनी !
वर्णाया कवि कालिदासच हवा वाग्देविचा सन्मणि ! १३

लज्जा नम्रमुखीं मदालस तनू ती सस्मिता बोलली
नाहीं प्रीतिस पात्र ही प्रणयता दासीवरी आपुली !
म्यां प्रेमातिशयें तिला निजकरीं स्वांकीं मम स्थापितां
तेव्हां जी नयन—द्युति चमकली वर्णील ती कोणता ! १४

# पंजरस्थ विहग.

## शिखरिणी.

वनीं उद्यानीं वा, प्रमुदित मनें सत्य फिरणें
लताकुंजीं केव्हां तरु किसलयीं नित्य शिरणें;
फलें पुष्पें खाया मधुर जल प्यायास सुभगा!
कुठें ते गेले बा! सुखद दिन सारे तव खगा! १


सुशाखीं वैशाखीं तरुवरि बसावें कधिं कधिं,
कधीं त्वां काढावे मधुर वच कंठांतुनि सुधी!
मरुद्वीची देई तुजसि मग झोंके बहु परी
गड्या! तो येई का समय सुखकारी कधिं तरी! २

भराऱ्या माराव्या कितिक सहजीं त्वां सहचरीं
सुहृत्पक्तींतूनी कितितरि फिरावें दिनभरी;
करावा आनंदें कल कल किती शब्द गगनीं
अहा! गेला गेला सुखद विहगा! काल निघुनी! ३

निसर्गानें प्राप्त प्रथित नभ हा पंजर कुठें!
तुझें हें लोखंडी अहह! घरटें कृत्रिम कुठें!
न निंबें दाडिंबें नच सुरस आंबे हि मिळती,
मिळे पाणी ज्यांत त्वदिय मलमूत्रें मिसळती! ४

तुवां काढावी बा! सतत रमवाया मधुगिरा,
कसें ऐसें त्याचें प्रतिफल मिळे हाय! रुचिरा!
नको झांकूं नेत्रा, सलिल नच आणि स्वनयनीं!
उगा राहें आहे 'कृतिविकृति' ऐशीच भुवनीं! ५

प्रभूच्या नामाचा कितिक महिमा संत कथिती,
तुला येई मात्र प्रतिति उलटी पूर्ण जगतीं;
मुखीं तन्नामाचा गजर करिशी विठ्ठल असा,
दया कां येईना सदय हृदयातेंहि सहसा ! ६



## फुगडी.

आयुष्यांतिल कामें सरलीं,
विश्रांतीची आशा उरली;
श्रमसार्थकता बरी करूं,
खेळूं आतां फुगडी फूं, घालुनि पिंगा फुगडी फूं,
खेळूं आतां फुगडी फूं.

[ २ ]

दृढनिश्चय हा पदर खोंविला,
मळ अंतरिंचा सारा धुतला;
अद्वैताचीं पदें जुळूं,
खेळूं आतां फूगडी फूं, घालुनि पिंगा फुगडी फूं,
खेळूं आतां फुगडी फूं.

[ ३ ]

प्रेमकरांची ग्रंथी केली,
निर्भय तनु मागेंचि सारली;
आनंदाचा फेर धरूं,
खेळूं आतां फुगडी फूं, घालुनि पिंगा फुगडी फूं,
खेळूं आतां फुगडी फूं.

[ ४ ]

फेर घेतले दोन चार ते,
विश्व लागलें फिरावयातें;
थांबुं नको गे! फिरूं फिरूं,

खेळूं अजुनी फुगडी फूं, घालुनि पिंगा फुगडी फूं,
खेळूं अजुनी फूगडी फूं.

[ ५ ]

अतिरेकाची कमाल झाली,
चित्तवृत्ति ही त्यांत बुडाली;
एकरूपता पहा उदेली,
खेळूं खेळूं फुगडी फूं, घालुनि पिंगा फुगडी फूं,
खेळूं खेळूं फुगडी फूं.

[ ६ ]

फूं फूं करितां भान उडालें,
शब्दहि सुटला मौन राहिलें;
भ्रमण मात्र तें असे सुरू
तरीहि खेळूं फुगडी फूं, घालुनि पिंगा फुगडी फूं,
तरीहि खेळूं फुगडी फूं.

[ ७ ]

प्रेमबंधनें सारीं सुटलीं,
शिथिल तनू भूवरी पातली;
नेत्र उघडिले तदा हळू,
कैंची आतां फुगडी फूं, कैंचा पिंगा फुगडी फूं,
कैंची आतां फुगडी फूं.

[ ८ ]


गगन लागलें फिरावयातें,
कुठें घेउनी जाइ मला तें;
स्थिती कशी ती मुखें वदूं,

5485

ऐशी झाली फुगडी फूं, झाला पिंगा फुगडी फूं,
ऐशी झाली फुगडी फूं.

[ ९ ]

स्थित्यंतर जाहलें स्थितीचें,
परी न माझें झालें साचें;
हसणें रडणें मात्र सुरू,
बरी असे ही फुगडी फूं, बराच पिंगा फुगडी फूं,
बरी असे ही फुगडी फूं.



# भुजंगा !

## शिखरिणी.

भुजंगा ! सत्संगा जरि सतत सेवूनि रमशी,
कशी त्वच्चिद्वृत्ती सुकृति पथिं ये ना वद मशीं ?
निजोत्संगीं संजीवन तव करी चंदन तरु,
सुगंधोर्मी त्याची विषयुत कसा पाहसि करूं ! १

सहिष्णु श्रीविष्णू करि शयन जो त्वत्तनुवरी,
हरी दुर्बुद्धीचा मल सकल जो सौख्य वितरी;
तुवां केलें त्याशीं समर यमुनेमाजि निकरें,
खरें नीचत्वाचें स्वरुप नच याहूनि दुसरें ! २

तुला जो अत्यंत प्रिय गमतसे चंदनतरु,
करूं तच्चूर्णाचें शयन तुज; युद्धांतुनि तरूं;
महाशेनें ऐशा तुजसिं निजपृष्ठींहि वहिलें,
तया कर्णालाही विपदिं सपदि त्वां फसविलें ! ३

सुगंधें आनंदें रसिक शिरती चंदनवनीं,
अरेरे ! फूत्कारें बघुनि तव ते कांपति मनीं;
खऱ्या भोक्त्यांना त्वत्सम खल किती येथ असती,
मति-भ्रांति त्यांची निवटिल कशी कोण जगतीं ? ४

भला भेटे वाटे द्विरद ! गुरु तो नारद तुला,
बरा केला होता प्रथम तुज बोध-स्थित-खला;
परी तो पुण्यात्मा मुनि सदय, तूं मात्र कुलटा !
तुवां केला त्याचा द्वितिय उपदेशार्थ उलटा ! ५

फणींद्रा त्वच्छीर्षीं मणि बहुत तेजस्वि वसतो,
विधात्याची ऐशी विषम कृति मी फार बघतों !
मुळीं नाहीं तेणें उपकृति तुझ्या हातुनि घडे,
" खलांचें कांहींही जगतिं उपयोगी नच पडे !" ६

अहे ! आहे, झाले, अणिक जगतीं होतिल, कवि,
नवी नाहीं कांहीं कथित अजि ही गोष्ट बरवी;
कुणाची गाईना, पुढति हि तुला गाइ न गिरा,
पुरा दुष्कृत्यांचा दिससि पुतळा तूं अजगरा ! ७



## सृष्टीची गौर.

### गाणें.

सुपुष्प लतिकावलि फुलली
रजतरक्त–वसनें ल्याली;

सृष्टीची गौरीपूजा
प्रतिवार्षिक आलीच मजा;

परिमल सुटला पाहिं गडे!
इकडे तिकडे चोहिंकडे;

वायु दूत होउनि जाई
भृंगावलितें करि घाई;

चला, चला, ग! गौरीला
लतामंडपीं पूजेला!

इश्श! काय तरि हें बाई!
सृष्टीला न कळे कांहीं!

काय कोकिळा ती नव्हती
तीच दूतिका पाठवती;

पुरुष बहू उद्धत बाई!
निमंत्रणाची किति घाई!

असो चला जाऊं साऱ्या
लाज लाजवूं मग सखिला.

२

वळल्या भृंगावलि साऱ्या
बद्ध पंक्ति होउनि आल्या;

दारावरि दिसली दूती
गात कोकिळा ती होती;

आतिथ्यास्तव कीं गान
मोहवि जें नुरवी भान;

पंचम तार-स्वर चढला
गुंजारव त्यांतचि रमला;

गात गात त्या गृहिं शिरल्या
मानपान विसरुनि गेल्या;

हळुच पाय ठेवा बाई !
सुमरचना विखरुनि जाई !

तूंच असेना मैत्रिण ती
कीं दूतातें पाठवि जी ?

बरीच ग ! शहाणी झाली !
लाल भडक शालू ल्याली !

दावुं नको आह्मां तोरा
दाखविं जा त्या मनोहरा !

नका बोलुं ग ! तिला कुणी
लाली चढली पहा ? झणीं !

येइल आतां झणकारा
मारिल मोठा फणकारा !

३

शर्थ असे बाई ! बाई !
जिव्हेला हाडचि नाहीं !

मंद मरंदाचे सारे
घट फुटुनी रस हा निचरे;

विखरुनि गेलीं पुष्पें हीं
तुह्मा तयांची क्षिति नाहीं;

पुरे किती मेली थट्टा !
उगिच पेटतां कां हट्टा ?

होइल आतां गृहिं येणें
तोंवरि पूजा ही करणें;

पराग कुंकुम हातीं घ्या
सुगंध उटि ती हीं घ्या ! घ्या !


बधिर किती ग ! तुह्मि बाई !
गौरीची शुद्धचि नाहीं !

अर्पुनि हीं सारीं तिजसीं
नविन फुलें देऊं पुढतीं;

बसवूं शाखेवरि तिजला
देइल झोंके वायु तिला;

गा ग ! गा , साऱ्या गाणीं
गाइल ती कोकिळ वाणी;

साथ करूं आपण साफ
घेइल मग ती आलाफ;
अहा ! किती मंगल काल
वसो असा हा चिरकाल !



# तेंच हें स्थान !

( चाल–चंद्रकांत राजाची कन्या. )

तेंच असे हें स्थान आमुच्या भव–विश्रांतीचें,
आनंदाचें सर्वस्वाचें निधान शांतीचें. १

इथेंच आह्मी खेळ खेळलों प्रेम–विलासाचे,
आठवतां हृदयातें येतें भरतें दुःखाचें. २

जेथें गेले दिवस सुखाचे अमुचे दोघांचे
शोक–गृह जाहलें हाय ! तें माझें एकाचें ! ३

जेथें हास्यविनोद सखीसह केले कित्येक
तेथें आतां रडावयाला उरलों मी एक ! ४

जगांत दिसुनी येते विषम–स्थिति नित्या कां ही ?
चर्मचक्षुंना दैवचमत्कृति ना कळती कांहीं ! ५

हर्षामध्यें शोक वसावा, शोकांतचि हर्ष,
निराशेंत आशातंतूनें होतो उत्कर्ष. ६

द्राक्षांच्या मधुरसांत कैसा मदिरेचा अर्क !
मधुरा मदिरा कैशी वाटे चालेना तर्क ! ७

प्रीतीमध्यें विरह वसावा, विरहांत प्रीति,
सुखदुःखाचें मूळ एक, ही काय असे रीति ! ८

माझी प्रीतिलताच जळाली, विरह उरे मात्र !
विरहा ! देशिल कां तें माझ्या प्रीतीचें पात्र ? ९

देशिल दे तरि दुःख कितीही, मी तें साहीन !
पुन्हा एकदां तरि त्या माझ्या प्रियेस पाहीन ! १०

उदासीनता येउनि जातां प्रसन्नता येई,
प्रसन्नतेची उदासीनतेविण किंमत नाहीं ! ११

सुधा गळाली, हालाहल जें उरलें विरहाचें
कैशी येइल सुधा त्यांतुनी वेड मला याचें. १२

काय असे ही खुळी कल्पना, खुळाच मी झालों !
अमूर्त मूर्ती दीन याचना करावया आलों. १३

[ २ ]

कुंजवनीं करि मंजुल गुंजारव भृंगावलि ही,
सखिच्या कच–बंधन–भ्रमानें मजला फसवी कीं ! १४

खराच पंचम–सुरांत एक न बेसुर सुर वितरी,
नवलचि अभिनव सुमकलिकेवरि कोकिल गान करी ! १५

रम्य गायनीं साम्य तुझें बा ! पावे मत्कांता,
'कोकिलकंठीं' नाम तिचें तें आठवतें आतां. १६

निर्मल परिमल मलय मारुतासह धांवत येई,
प्रियप्रियांच्या प्रीतिलतांनां हालवुनी जाई. १७

चातक भारद्वाज आणि जे खगांत अवतंस,
तडाग, सरिता, वापीं आपीं पोहति ते हंस. १८

जलबिंदूंतुनि रविकिरणांनीं इंद्रधनुष्याचें
नयनमनोहर रूप दिसे तें कारंजें साचें. १९

आहे सर्व जरी पूर्वींचें सुखोपभोगाचें
दुःखस्मृतिदायक कां ? कारण योगायोगाचें ! २०

[ ३ ]

पुष्पलतांनीं आलिंगित तरु शोभिवंत दिसती,
खुलती, डुलती, बघती, हसती, मजला लाजविती ! २१

अलि नलिनींच्या कानीं जाउनि हितगुज कथितात,
'गुं गुं' करुनी वेडावुनि कां मजला जातात ! २२

नभोविहारी जलसंचारी खगतति कासारीं
जातां सन्निध पाहुनि मजला सरते कां सारी ! २३

स्पर्श न दर्शन करावयाला मम कोणी राजी !
आजी अंतःकरणीं उठल्या दुःखांच्या राजी ! २४

प्रिया विभोगी दैव विभोगी दुःखातें भोगीं,
न स्मृति जागी पुरा अभागी ठरलों भू-भागीं ! २५

सुनील गगनीं सजल जरी घन फिरतो चोहिंकडे
सोत्सुक, विद्युल्लतेविना कुणि पाहीना तिकडे ! २६

उदयाचलिं रवि नित्य उषेसह विराजतो भुवनीं,
भवनीं भवनीं तरुतरुंवरुनी द्विज गाती कवनीं. २७

निसर्गसृष्टि–प्रकृतिरमणिला नास्तिक पाहूनी
प्रभुपदिं ध्याती, गाती अंतीं तनुमन वाहूनी. २८

प्रतिभारमणीवांचुनि कविचा गौरव झालेला
नाहीं अवलोकिला, ऐकिला, रसिकां रुचलेला ! २९

तशीच माझी स्थिती जाहली तुजविण ललने ! गे
स्वर्गाच्या सोपानावरुनी ये ये चल वेगें ! ३०

विकसित कलिका अवचित विकलित होउनियां गळतां
अलि पिक शुक सारिका सोडिती तरु बघतां बघतां ! ३१

गळतां माझी हृदयतरूची कलिका शुचिवंता,
अवमानिति परिचितही सारे हा ! हा ! भगवंता ! ३२

[ ४ ]

निर्झरणीच्या याच शिलातलिं गाणीं सुखकारी
गाउनि माझी उदासीनता घालविली सारी. ३३

अजुनी तीं सारींही माझ्या गुणगुणती कानीं !
परी न दिसशी सांग कुठें तूं लपलिस या रानीं ? ३४

शोध शोधुनी फिरफिरुनी हे थकले पाय जरी,
त्वन्मूर्तीच्या कल्पनेंत मज आठवलें न परी ! ३५

लतालतांतुनि तुजला नामें बाहियलें सुदती !
तुझें नाम मन्मुखिं ऐकुनि त्या शुभ्रसुमें हसती. ३६

मजला प्रियकर अतिशय सुखकर नाम तुझें असतां
वदना वाटे बोलुं नये, ही काय असे समता ? ३७

शास्त्रानें तूं माझी झालिस, मीहि तुझा ठरलों,
परस्परांचीं नांवें वदण्या कां मग अंतरलों ? ३८

रूढीची बलवत्तर सत्ता वांकविते मान !
सुधारकांना सहन करावा लागे अपमान. ३९

असेल अथवा कारण दुसरें त्वत्-सखि !-हास्याचें !
सांग सांग जिवलगे ! मला गे बीज रहस्याचें ? ४०

हाय हाय ! परलोकीं गेली कैशी वदणार !
प्रेमाचीं हीं असलीं कोडीं कोण उकलणार ! ४१

[ ५ ]

जलप्रवाहीं पाय सोडुनी खेळत बैसावें,
मी येतांची जवळी मजवरि जलकण उडवावे ! ४२

तुझ्याच पदरें पुसतां, लटिका राग किती यावा !
जावा म्हणुनी किति शृंगारिक विनोद योजावा ! ४३

परागमिश्रित कमल मजवरी हळूच फेंकावें !
नेत्र झांकतां खुपतां तेथुनि पळूनियां जावें ! ४४

शोधूं जातां लतालतांतुनि मजला चकवावें !
कुंजाकुंजांतुनि लपुनी त्वां मजला फसवावें ! ४५

निराश होउनि बसलों असतां हलकें येऊनी
मागूनी मन्नेत्र झांकशी दोन्ही हातांनीं ! ४६

नांवाविण नच सुटका झाली माझी त्या कालीं !
स्वर्गाचा आनंद आणिला होता तूं खालीं ! ४७

तें सुख गेलें, ते दिन गेले, तूंही गेलीस !
उरलों कैसा मीच एकटा लागें झुरणीस. ४८

पळतां पळतां श्रमली असतां पदांत अडखळतां
हात देउनी सांवरली तनु कबरी विस्खलिता ! ४९

तुझ्यामागुनी भ्रमर धावती गुंजारव करुनी
मुखकमलीं कीं कचकमलीं मधु सेवावा ह्मणुनी ! ५०

माझ्यापुढती भ्रमर धावती, भ्रमरापुढती तूं !
हेतू एकचि अमुच्या अंतरिं, परि नव्हता किंतू ! ५१

कृष्ण कबरिवरि कृष्ण अली तैं बसती जाऊनी,
शुभ्र मुखीं तव शुभ्र हास्य मज आलें पाहूनी ! ५२

निटिलीं घर्मावलिची झळके नव मौक्तिकमाला,
कीं चंद्राभोंवती मिळाला तारांचा मेळा ! ५३

शुभ्र चंद्रमुख, शुभ्र चांदणें, चांदण्याहि शुभ्रा,
पवित्रतेच्या शुभ्र यशाची पताकाच शुभ्रा ! ५४

होती या उपवनांत विलसत मंदसमीरांत !
निर्दय काळें हिरावुनी जी नेली स्वर्गांत ! ५५

[ ६ ]

बसलों होतों लतामंडपीं येथें त्या दिवशीं—
झोंप घेतली माझ्या अंकीं, आठवतें मजशीं ! ५६

मधुनिमधुनि तव घर्मबिंदुंना पुसिलें शेल्यानें,
कुरळ केसही हळुच सारिले म्यां ते हातानें. ५७

मंद वायुनें तव मुखपरिमल पसरे चोहिंकडे,
तरुलतिका सोडुनि तुज शोधित अलि येती इकडे ! ५८

अंकावरच्या मुखकमलाला ठेवुनियां खालीं
जल आणाया गेलों, मागें जागृत तूं झाली. ५९

"होणारें तें होतें, मनही त्या मार्गीं वळतें,
पश्चात्तापें कृतकर्माचें प्रायश्चित मिळतें." ६०

अनुमोदन त्वां दिलें न जाया मज दूरप्रांतीं,
त्यावरि ऐसें घडतां कैशी पडे न ती भ्रांती. ६१

दमयंतीच्यासम रडलिस तूं स्फुंदस्फुंदूनी,
हेतुपुरस्सर नव्हतों गेलों परि तुज सोडूनी. ६२

" मुळांत कारण नसतां दुःखप्रसंग येतात !
व्यर्थ जिवाला त्रास कल्पनातरंग देतात ! " ६३

तुला वाटलें " काय जाहल्यें हाय ! निराधारा !"
कोमलहृदये ! गळल्या किति तव अश्रूंच्या धारा ! ६४

[ ७ ]

घेउनि आलों स्वच्छ झऱ्यांतिल तुज प्याया पाणी,
परि तुज पाहुनि झालें माझ्या हृदयाचें पाणी ! ६५
पूर्णचंद्र मावळुनी दिसली वितेज इंदुकला,
करतलिं ठेवुनि बसली होतिस तूं अपुल्या गाला. ६६
कष्टविशी मन्नाममुद्रिका पाहुनि जीवाशीं,
बसली दिसली दुसरी सीता अशोकवनवासी ! ६७
निराश्रिता पाहतां लता तुज विचार मनिं येई,
"समदुःखी भेटतांच दुःखावेग कमी होई !" ६८
तों साश्चर्यें प्रसन्नवदने ! पाहुनियां मजशी
प्रश्न विचारुनि पुरेपुरेसें केलें त्या दिवशीं ! ६९
अर्धें हसरें, अर्धें रडवें तें मुख तेव्हांचें
अंतश्चक्षूंपुढें उभें हें आहे केव्हांचें ! ७०
त्याच दिनीं मी कारण झालों रडवाया तुजला,
प्रसंग पहिला कसला आला बघण्या अश्रुजला ! ७१
मला मात्र तूं कारण झालिस अखंड रडवाया !
दुर्दैवाचा घाला आला गेला नच वाया ! ७२
बाहुलतांनीं बद्धकंठ करितां मम वच गेला,
कायमचा कां मुक्तकंठ हा रडवाया केला ! ७३
माझीं दुःस्वप्नें पडलीं तुज, प्रेमें शांतविलीं,
त्यांची येथें विपरित करणी मीं ही अनुभविली ! ७४

[ ८ ]

विलंब झाला मज येण्याला, तूं साधी भोळी !
परि मजविषयीं संशयवादी झालिस त्या वेळीं ! ७५

होतों जवळी खूण आत्मगत वचनांची दावीं,
लाजुनि खालीं पाहुनि ह्मणशी "चुकलें मी बाई !" ७६

प्रीतीचीं भूषणें प्रीतिनें अपुलीं वाढावीं,
प्रेमाचीं कंटकें खरोखर प्रेमें काढावीं. ७७

ताजें सुम खोविलें मला ती आठवते वेळ !
लाली आली गालीं, झाला जादूचा खेळ ! ७८

तेव्हांची त्वन्मूर्ती जों मी दृष्टिपुढें आणीं
भडभडुनीयां येतें, स्रवतें नयनांतुनि पाणी ! ७९

वसंतसमयीं पूर्ण चंद्रमा गगनीं अवतरला,
चंद्रहार मीं चंद्रमुखी ! तव कंठीं अर्पियला. ८०

परागमिश्रित परिमलविश्रुत पुष्पें गुंफुनियां
मत्कंठीं घातला हार तूं—आहे अजुनी हा ! ८१

अर्पावा निर्गंध तुला, तूं सुगंध अर्पावा,
वर्णांनीं हा गुणवति सद्गुण कैसा वर्णावा ? ८२

प्रेमळ हृदयीं निष्प्रेमाची जड वस्तू ठेवी,
चुकलों ह्मणुनी रसिकत्वाचा पाठ नवा देई. ८३

आह्मी शिकलों, इतर शिकविले, अजुनी शिकवीतों,
शब्दजाल पसरुनियां अज्ञा जगतीं फसवीतों ! ८४

कांहिं न कळतें, पडतें उपड्या घटावरी पाणी,
वेदांताचें वाचन कोणि न आचरणीं आणी ! ८५

[ ९ ]

कोमल-कर-कंकण-रव-मिश्रित जल मज अर्पावें !
तिलांजलीनें म्यां का आतां तुजला तर्पावें ! ८६

" माझ्यासाठीं ध्याच एवढा ! " ह्मणुनी वाढावा
त्या भाताचा पिंड कसा मीं त्वदर्थ पाडावा ! ८७

तूं रचिलेल्या मृदु शय्येवर तुजसह पहुडावें,
दूर तुला दर्भासनिं ललने ! कैसें बसवावें ! ८८

शिव ! शिव ! आली काय वेळ ही मन व्याकुळ होई !
दुष्ट विधीचे लेख फाडुं का फोडुनि ही डोई ? ८९

विरहाचा वृश्चिक जरि अंतरिं मारितसे डंख,
तुजविण नाहीं मांत्रिक दुसरा, वदतों निःशंक ! ९०

झाली असशिल पुण्यमयी गे ! तूं स्वर्गीं देवि !
या पाप्यानें संग अतां तव वांच्छावा केंवी ? ९१

स्वर्गंगेचें सखे ! स्नान तूं केलें असशील !
त्यावांचुनि दिव्यता कशी ती तुजशीं येईल ? ९२

त्यासमयीं मह्लीलास्मृतिनें रडली असशील,
टप टप अश्रुजलाचे मौक्तिक गळले असतील ! ९३

कोणी नाहीं नेत्र पुसाया ! पुसले असशील !
खालीं पाहुनि पदर सांवरुनि बसली असशील ! ९४

सुरललनांचा मेळा जमला असेल तुजभंवतीं !
प्रश्नांची जाहली असेलचि तुजवरती भरती ! ९५

पुण्यमयी तूं, सत्त्वमयी तूं, पतिव्रता, विमला !
प्रेमस्निग्धा, वियोगदग्धा, मुग्धा, ठावि मला ! ९६

काय उत्तरें दिधलीं असशिल तेव्हां ? मृगनयने !
अपरिचितांशीं नेणसि भाषण करणें, सुखशयने ! ९७

" स्त्रियास्त्रियांची ओळख होते गांठी पडतांच, "
" हृदय उघडतें सुखदुःखाचें भरतें येतांच." ९८

" दुःखाचा भर येउनि जातां ये शांती कांहीं, "
" महापूर ओसरतां नदिचें जल निर्मळ होई. " ९९

दिव्य विमानीं भव्य कमानीं बसवुनि त्या तुजशी
हांसत खेळत रमवित मिरवित नेतिल स्वर्गाशीं ! १००

स्वर्गाच्या कोंदणांत खुलशिल हिरकणीच खाशी !
होती एका काळीं सुंदर माझी मजपाशीं ! १०१

चमकशील वा तारारूपें प्रतिनिशिं आकाशीं !
माझ्या दैवीं आली आतां " रामेश्वर काशी ! " १०२

तुझ्याच नांवा आठवीन मी प्रभुरामस्मरणीं,
असो नसो वा हातामध्यें रमणी गे ! स्मरणी. १०३

अंतींही त्वन्नामें पंचप्राण विसर्जीन !
चित्च्छक्तीच्या रूपें येउनि तुजला भेटेन ! १०४

धीर धरीं तोंवरी कसातरि, विरहातें साहीं !
वदती " विरहावांचुनि महती प्रीतीला नाहीं!" १०५

चिरसौख्याच्या सागरांत गे ! आपण मग पोहूं !
दुःखावरती तोंवरि झांकण दोघेंही घालूं ! १०६

## हा कशाचा परिणाम ?

### श्लोक.

नाहीं 'म्यॅट्रिक' आणि 'फायनल'ही झाल्या परीक्षा पुऱ्या,
हाटेलांत खुशालचंद बनुनी खाती बटाटे–पुऱ्या;
गर्वें मूर्खपणें 'सुधारक' अशा नांवास जे पावले,
तत्स्नेहें जड शब्द ही बिघडुनी निंदार्थ ते जाहले. १

करूं अंत्यजोद्धार, अस्पृश्यजाती
स्वधर्मास सोडून खिस्तांत जाती;
जरी स्तुत्य ते सत्य उद्देश होते,
घडे कृत्य प्रत्यक्ष कांहीं न हो ! तें. २

स्त्रिया लाविल्या पाहिजे शिक्षणाला,
ठरावा मिळे मान्यता तत्क्षणाला;
चहाच्या वशा लावुनीयां मुखाला,
फुकें सेविती कल्पनेच्या सुखाला. ३

बूट कोट छडि आणि विडी ही,
पाहिजे वरि खिशांत घडी ही;
पाहती वडिल ते नयनांहीं,
हांसती जन तरी, भय नाहीं ! ४

सर्वांनीं क्लब एक तो मग पुढें गांवामध्यें स्थापिला,
मूर्खांचा जणु रात्रिंचा मज गमे अड्डाच तो जाहला;
सूज्ञां तुच्छिति, पुच्छहीन गमती सारीं जशीं माकडें !
मातें ना कळतें, कथा सुजन हो ! हा दोष कोणाकडे ? ५

आले सर्व मिळून एक दिवशीं, बाबांकडे यावरी,
गप्पा मारुनियां किती उडविला सप्पाच पानांवरी;
"व्हावें आपणही सभासद" असा तो चालला आग्रह,
बारावे सगळेच–हाय !–जुळले कीं नष्ट दुष्ट ग्रह ! ६

बाबांना नव्हता विचार पुरता, किंवा कुणी सांगता,
त्यांचें तें मजला अधःपतन हो! ये ना मुळीं सांगतां;
त्यांची, आणिक त्यामुळेंच अमुची जी दुर्दशा जाहली,
तीतें आठवतां अहा ! स्वतनुची होते जणों काहली ! ७

आई होती जवळच, तिनें ऐकिल्या सर्व गोष्टी,
कष्टी झाली, भयद गमली भावि–संसार–सृष्टी;
झाल्या होत्या तिजसिहि कथा ज्ञात कर्णोपकर्णी,
कर्णीं येती वच सहज त्या कासया कोण वर्णीं ? ८

मातें सर्व न आठवे, मज असे तैं वर्ष कीं आठवें,
झाली दुःस्थिति आमुची स्वहृदयीं संपूर्ण ती सांठवे;
लोकांनीं जरि 'तातनिंदक' असा शेरा मला हा दिला,
होवो सत्य सुधारणा ह्मणुनियां म्यां तो सुखें साहिला ! ९

नसे कामधंदा, क्लबाचाच बंदा,
सुचे बुद्धिमंदा न कांहींच धंदा;
पिती औषधें कां? नसे रोगराई,
विचारूं नका, चालली मोंगलाई ! १०

आई होय पिशी, तशांत घडलें तों काय एकादिशीं,
होती त्या दिवशीं मला स्मरतसे कीं सत्य एकादशी;

---

१ दारू.

झालों जागृत, पाहतां स्वजननी ती सारखी ओरडे,
होता ओढित तात निर्दयपणें पाठीवरी कोरडे ! ११

झोंके जाति, पदोपदीं अडखळे, अस्पष्ट शब्दावलि,
वाटे जीभ अमंगल–प्रवचनीं कीं पूर्ण नाणावली !
बाबांना कसली विचित्र असली ही भूतबाधा जडे,
आणूं मांत्रिक कोणता तरि असा मी संशयीं या पडें. १२

कशाची तरी घाण येई घरांत,
नसे लक्ष माझें, परी त्या भरांत
उभा राहिलों त्यापुढें जाउनीयां
विनंती करीं दों करां जोडुनीयां. १३

नका मारूं बाबा ! जननि उपवाशी मम असे,
तुह्मासाठीं एकादशि शुचिपणें ती करितसे;
मला मारा झोडा, तिजसि न उगारा निजकरा,
जरी माझ्याठायीं वसत असला स्नेह अपुला. १४

खरा होता स्नेह, प्रतिति मजसीं येइ बरवी !
क्षणामधें झाली अहह ममही पाठ हिरवी !
अगाई ! गे ! आई ! ह्मणुनि रडलों, तीहि रडली,
अहा ! तें आईचें हृदय कथितां बुद्धि अडली ! १५

मागूनी तें मग मज कळे, जाति बाबा क्लबाला,
आली तेथें सुरुप असली नर्तकी एक बाला;
द्याया कंठाभरण तिजला सर्व झाला प्रकार,
आईला तो नविन जडला हृद्व्यथेचा विकार. १६

त्यांची ती कृति एकएक पुरती येई न हो सांगतां !
संसारांत विवेकहीन बनतां यावी कशी सांगता ?

"कांहीं सोय धरा, न दों प्रहरची राहील ही साउली!"
ऐसें सांगुनि भागली हितवचा माझी तदा माउली. १७

नसे रोख पैसा, करूं आज कैसें ?
विचारांत ऐसा किती तास बैसे !
मिळेना कुठें मालही तो उधार,
फुका द्यावया कोण होई उदार ! १८

होता लौकिक फार थोर अपुला, ही कोण आली दशा !
येतां शुद्धिंत पूर्ण त्यासहि कळे, झाली खरी दुर्दशा !
केले निश्चय दांडगे कितिकदां, आणा बहू वाहिल्या,
व्हाव्या पाठ पुनःपुन्हा ह्मणुनियां घोकून कीं पाहिल्या. १९

मिळे भाकरी खावया जेमतेम,
उपासा नसे आइच्या पूर्ण नेम !
अहा ! शुष्क झाली तिची देहयष्टी,
उदासीनतेनें बसे शून्यदृष्टी ! २०

निराशा दिसूं लागली जों पतीची,
गळे अश्रुधारा अहा ! त्या सतीची;
पुढें काळजी लागली तीस माझी,
वदूनी परी दाखवी ना समाजीं. २१

गहाणाचा धंदा अजवरि घरीं चालत असे,
सुरू झाला—त्याचें स्वरुप उलटें मात्र विलसे !
क्रमाने दागीने धनिकगृहिं जाऊन बसले !
मला वाटे येथें खचित अमुचें दैव हसलें ! २२

खूप पाजुनि सुरा जनकातें,
शेत आणि घरही निजहातें

घेतलें लिहुनि मित्रजनांहीं !
पाप–मार्ग दिसला जणु नाहीं ! २३

चूक सर्व कळतां निजताता,
घेइ मारुनि शिरीं मग हाता;
धाय मोकलुनि माय रडे ती
येइ मूर्ति मम दृष्टिपुढें ती ! २४

कोणि येउनि घरांत सकाळीं
रोज सांगति 'करा घर खालीं!'
पाहुनी घर असेंच निकामें,
तें दिलें करुनि सर्व रिकामें. २५

वैभवांत दिन ज्या गृहिं गेले,
तें स्मशान जणु होउनि ठेलें !
काय दु:स्थिति अह्मां तरि येई
धन्य ! धन्य ! मदिरे ! तुज बाई ! २६

नाहीं डोळे तरि उघडिले, काय ही स्वैर वृत्ति !
ताताचें तें कथन कथितां वाटते लाज चित्तीं !
होतो नम्र प्रथितहि जगीं संकटीं मत्त हत्ती,
सांगा ! देवा ! व्यसनिं जनता आकळायास युक्ति ? २७

लज्जा थोडीबहुत असते जी जनाची मनाची
ती सारीही विकुनि धरिती वाट हे वारुणीची !
येतांना तो गलित वसनें होय सारा तमाशा !
वारायाची स्मृति न उरते जाति तोंडांत माशा ! २८

असंबद्ध अस्पष्ट व्याख्यान चाले,
मुलांच्याच टाळ्यांत संतुष्ट झाले!
इथें तोल गेला, तिथें झोल गेला,
अरेरे! म्हणूनी गटारांत ठेला! २९

उठूं पाहतां तैं मुळीं हालवेना,
वदूं पाहतांही पहा बोलवेना;
पडूनी तिथें हातपायांस झाडी,
पहाती परी त्यास कोणी न काढी! ३०

करी सर्व एकत्र शक्ती अहा! ती
खरी सूकराचीच वृत्ती पहा! ती;
सुटे कोण ती घाण राही उभा जो,
तया पाहुनी चित्तिं भंगीहि लाजो! ३१

जनाच्या आरोग्याविषयिं अधिकारी जपति जे,
अवेळीं स्नानातें करविति तया शीत उदकें;
विशुद्धी शुद्धीतें वरुनि मग गेहांत शिरतां,
पडूनी राही तो दिन भरि नये त्यास फिरतां. ३२

असें व्यसन लागतां करिल जीवनाशास तें,
घरांत वदण्या जरी कुणिहि आप्त ना शासते;
भविष्य कळलें कसें त्वरित सत्य तें जाहलें,
जडूनि हृदय-व्यथा जनक मृत्युला पावले! ३३

झोळी घेउनियां करीं, मधुकरी मागूनियां भाकरी
ओलीकोरडि खाउनी, झटुनियां अभ्यास भारी करीं;
त्याचें हें फळ आज मी अनुभवीं, दुर्दिन गेले परी
त्यांच्या या उठती विचार लहरी अंतःसमुद्रावरी. ३४

क्लबाचें कुठें नांव येतांच कानीं
स्मृती होय कीं घात केला ठकांनीं !
नसे दोष संस्थेंत तो चालकांचा,
रुचावा कसा बोध हा बालकांचा ? ३५

हसोत, जन हासती जरि सुधारकांनों! तुह्मां,
करा खरि सुधारणा तरिच पाहिजे ती अह्मां;
स्वतांस जरि देशभक्त ह्मणतां, करा सत्कृति,
फिटेल तुमची न ती उपकृति घडे संस्मृती. ३६

# विहार.

## पृथ्वीवृत्त.

सुनील नभ जाहलें, हरित मेदिनी शोभली,
तशींच सरिता-जलीं विकच-पद्म--पुष्पें भलीं;
तिथें करि अहा ! पहा भ्रमर-संघ गुंजारवा,
मनोहर ' विहार ' हा सकल तापहारी नवा. १


नितांत मधुपालि तन्मधुमरंदसंप्राशिती,
सुशांत परि पद्मिनी मुळिं अहा ! न संत्रासती;
प्रमोद मनिं दाटला, समय योग्यही वाटला
अहा ! रसिकवृंद हा ह्मणुनि का इथें थाटला ? २

वियोग घडतां जनां विरह ताप देई मनां,
नसे रचित-कल्पना विदित सर्व कामी जनां;
सुसेव्य घडतां नियोजित तदीय संयोग तो,
पुन्हा ह्रयद-मीलनीं प्रणय-सौख्य संभोगितो. ३

गळे सुरस त्यामुळें जल सुरक्त झालें पहा !
वरी हरित हीं बरीं चलित-पद्म-पत्रें अहा !
सुरंजित जलांगणीं कितिक हंस हे पातले,
प्रयोजन कुणीं कशास्तव बरें इथें घातलें ? ४

तडाग सरिता जणों प्रथित मासिकें वाटती,
सुवाङ्मयजलें सदा विलसती, न जीं आटती;
तयांत कवि आणि लेखक खरीच पद्मावली,
बघूनि विहरे तिथें रसिक हंस भृंगावली. ५

'**विहार**' असला इथें बहुत म्यां सुखें पाहिला
दुजा अणिक तो "**विहार**"[1] कसला तुवां आणिला?
बघूं तर खरें! बघूं? ह्मणुनि त्यास संलक्षिता
विहार कवि हा करी कवन वाग्जलीं तत्वतां. ६



१ विहार मासिक.

# चंद्र–दूषण.

## शार्दूलविक्रीडित.

प्रेमाच्या लहरींत जो रवि–सखा नाना विलासा करी,
हा! दैवा! इतुक्यांत अन्य सदनीं गेला कसा तो तरी!
ऐसें जाणुनि सृष्टिदेवि चकिता ही जाहली काय कीं!
रोषाच्या लहरी ह्मणून उठल्या पाहा प्रतीची मुखीं! १


केल्या मन्मथ–केलि ज्यासह बहू प्राणेश तो भास्कर
गेला तोंचि गृहांत चंद्र शिरला हा जार कीं तस्कर!
भीतीनें नच शब्दही उमटतो तों मूर्च्छना पातली,
साध्वी दुःस्थिति ही अशी कधिं कधीं होते अहा भूतलीं! २

सोडूनी क्षितिजास इंदु शिरला आकाशद्वारांतरीं,
झांकी मोहपरायणा हळुहळू ज्योत्स्ना पटाभ्यंतरीं;
खालीं तैशिच ती वरी पसरली सर्वत्र निस्तब्धता,
कोणीही न तुझें विधो! बघतसे दुष्कृत्य हें सर्वथा! ३

चंद्रा! बा! तुज वानिती कितिक जे, वानोत ते बापुडे,
मातें ना बघवे तुझी कृति अशी मीं आणिली बा! पुढें;
तूतें गौतम-शापविस्मृति कशी झाली? कळेना मला,
जेणें लांछनयुक्तही चिर बहू केलें तुला निर्मला. ४

आहा! पूर्वदिशीं पहा पसरली ही दिव्य तेजप्रभा,
कीं पूर्व-स्मृतिनें सरोष सति ही पाहात आहे नभा;
छे! छे! गाळुं नको सते! तृणपटीं हे बाष्पबिंदू अतां,
हा आला तव नाथ गे! झणिं करीं त्याच्या बहू स्वागता. ५

प्रेमाचा कर एक कोमल तदा साध्वी मुखीं स्पर्शतां,
गेली सर्वहि खिन्नता, हळुहळू आली तिथें स्वर्णता !
झालें सर्व परी तव स्थिति विधो ! निस्तेज ही कां बरें ?
“ पापी सर्व जगीं वितेज वसती ” हें बोलणें कीं खरें ! ६



# तारापतन.

## शार्दूलविक्रीडित.

होत्या खेळत तारका विधुसवें प्रेमें नभःप्रांगणीं,
वाटे चंद्र न, नंदनंदन रमे सानंद गोपांगनीं;
कांहीं त्या जलकेलि फार करिती आकाशगंगांतरीं,
तज्ज्योत्स्नापट घेउनी विधु परी राहे उभा तो दुरी. १

कांहीं पोहति हांसती चमकती लज्जान्वती लाजती,
'दे दे दे निजवस्त्र' हस्तकिरणें संप्रार्थुनी मागती;
म्यां तो पाहुं नये विहार, परि ही मत्कल्पना दूतिका
गेली घेउनि, मीहि दृष्टि वळवीं अन्यस्थलीं सर्वथा. २

संख्यातीत कितीक त्या विलसती तेजोन्विता मानिनी,
स्वर्गाच्या रमणीय कां विहरती देवांगना काननीं!
हांसे एक, पळे दुजी अडखळे, हा खेळ चाले झणीं,
तों तारा च्युत एक त्यांतुनि अहा! झाली पहा त्या क्षणीं. ३

झाला एक गभीर आर्तरव तो दिग्मंडलीं व्यापला,
हा! हा! तत्पति मुक्तकंठ करि कां शोकामुळें आपला;
गेली कीं सखि हाय! काय रडल्या तन्मैत्रिणी सर्वही,
"मृत्यूचा समय प्रकंपित करी सर्वांसही या महीं."४

'गेली हाय! धरा धरा' म्हणुनियां कां दीनवाणी वदे!
"सांगावें कुणिं कोण काय सहसा बोलेल दुःखें मदें."
व्हावी कांहिं तरी परोपकृति ती, मी याच अर्थामुळें
जाऊं जों म्हणतों मधें बघितली नष्टाचि म्यां व्याकुळें. ५

जी येथें रमली, तिथें विहरली, नानास्थलीं खेळली,
लज्जेनें लपली, निशीं स्वपतिच्या अंकावरी लोळली;
नेत्रें झांकुनि पाहतां मजसि ये थोडी तरी कल्पना,
नाहीं स्पष्ट परी अहा! दिसतसे तन्मूर्ति मच्चक्षुंना. ६

सारे वांच्छिति यावयास वरती हे मर्त्य स्वर्गांतरीं,
तूं खालीं वद दिव्यता त्यजुनियां आली बये कां तरी?
कीं तो स्वर्ग नको मुळीं महि नको आली प्रतीती बरी?
मुक्तीचा पथ नव्य शोधुनि असा तूं काय त्यातें वरी? ७

पाहे जी क्षणिं मंद मंद सुपदन्यासा मनोमोहिनी,
वाटे राहुनिराहुनी नवल कीं गेली कुठें मानिनी?
आयुष्यांत असाचि सूज्ञ जनहो! येईल एक क्षण,
कालव्याघ्रमुखीं पडूनि तनुही होईल तद्भक्षण! ८

कांहीं खेद करूं नका, जग असे सारेंच हें नश्वर!
उत्पत्ति स्थिति नाश हा क्रम असा तो चालवी ईश्वर;
तेजानें चमका जगांत, विलसा सोडूनियां आळसा,
गातील स्मृति होउनी कवि असे त्या दिव्य तेजोरसा. ९

# चितोरगडचा वेढा.

## ( कथानक. )

चितोर ह्या राजपुतान्यांतील एक अत्यंत मजबूत व अभेद्य असा किल्ला आहे. तो केवळ राजपुतान्याचेंच नव्हे, तर सर्व हिंदुस्थानचें नाक होय, असें पूर्वी मानीत असत व हल्लींही मानितात; आणि ह्मणूनच सतराव्या शतकापूर्वी त्याच्या प्राप्तिकरितां, त्या वेळच्या मुसलमान पादशाहींत अनेक मुसलमान राजांनीं आपल्या शौर्याची पराकाष्ठा केली. परंतु **भीमसिंह, संग्रामसिंह, उदयसिंह** व **प्रतापसिंह** इत्यादिअनेक वीरपुंगवांच्या शौर्यशाली बाहूंनीं आपल्या तरवारीचें तिखट पाणी चाखविल्यामुळें त्यांस विन्मुख जावें लागलें, व ज्यास दैवयोगानें तो किल्ला लाभला त्यासही तो चिरकाल आपल्या ताब्यांत त्या वेळीं ठेवितां आला नाहीं. ह्या चितोरगडाकरितां रजपूत राजे व यवन राजे ह्यांचे जे अनेक घनघोर संग्राम झाले, त्या सर्वांत **अल्लाउद्दीनानें पद्मिनी**-करितां केलेले दोन संग्राम विशेष प्रसिद्ध व लक्ष्यांत राहाण्याजोगे आहेत. त्यांपैकीं पहिल्या प्रसंगाचें वर्णन आर्याछंदानें मी पुढील काव्यांत रसिकजनांपुढें मांडीत आहें.

या वेळीं **चितोर**च्या गादीवर **लक्ष्मणसिंह** नांवाचा अल्पवयस्क राजा असून त्याचा राज्यकारभार त्याचा चुलता **भीमसिंह** हा पहात होता. त्यानें **अजितसिंह** नांवाच्या शूर व पराक्रमी सिंहलद्विपाधिपतीच्या **पद्मिनी** नामक अत्यंत सुस्वरूप कन्येचें पाणिग्रहण केलें होतें. कांहीं झालें तरी इतर रजपूत राजांप्रमाणें आपलें कुलशील भ्रष्ट करून व मानहानी करून घेऊन अल्लाउद्दीनाचे अंकित रहावयाचें नाहीं, हा त्याचा बाणा होता व त्याप्रमाणें तो आपलें आचरणही ठेवीत असे; परंतु ज्यानें आपल्या प्रचंड सैन्यानें सर्व हिंदुस्थान पादाक्रांत केलें होतें, त्या **अल्लाउद्दीनास** तें कसलें सहन होणार ? त्यानें ताबडतोब **चितोरावर** स्वारी केली; ती केवळ वरील कारणामुळेंच केली असें ह्मणतां येत नाहीं. कारण त्यानें भाट वगैरे लोकांकडून **पद्मिनीच्या** सौंदर्याची स्तुति ऐकली होती, व किल्ल्यास वेढा दिल्यानंतर लौकरच त्यानें **पद्मिनीची** मागणी घातली. यावरून त्याच्या स्वारीचा अंतस्थ हेतु सहज कळण्यासारखा होता. वरील मागणीविषयींचें पत्र त्या मानधनाग्रगणी **भीमसिंहास** पोंचतांच त्यानें ताबडतोब युद्धाची तयारी केली आणि रजपुतांचें शौर्य **अल्लाउद्दिनाच्या** पूर्ण प्रत्ययास

आणून दिलें. शेवटीं आपणास **पद्मिनी**चें दर्शन तरी व्हावें अशी इच्छा त्यानें **भीमसिंहा**स दर्शविली. **भीमसिंहा**नें आपल्या बलाबलाचा दूरवर विचार करून तें त्यास आरशांत दाखविण्याचें कबूल करून त्याप्रमाणें दाखविलें. परत जात असतां **भीमसिंह** शिष्टाचाराप्रमाणें त्यास किल्ल्याच्या दरवाजापर्यंत पोंचवावयास गेला. परंतु **अल्लाउद्दीन** कसला कपटी! त्यानें तेथें दबा धरून बसविलेल्या आपल्या सैन्याकडून त्यास तेथेंच कैद करविलें. ह्यावर "मी माझ्या दासदासींसह आपणाबरोबर येतें. कांहीं दासी माझ्याबरोबर येतील व कांहीं मला पोंचवून परत जातील. तरी माझ्या या लवाजम्यास व जनानखान्यास कोणीं अडवूं नये, किंवा बघूं नये असा निरोप **पद्मिनी**नें पाठविला, व त्यानेंही तो आनंदाच्या भरांत कबूल केला. **पद्मिनी**नें लागलीच १०० पालख्या तयार करवून त्यांत आपले निवडक योद्धे बसविले व ती त्याच्या छावणींत गेली. **भीमसिंहा**ची व **पद्मिनी**ची शेवटची भेट झाली. त्याच वेळीं तिच्या परत जाणाऱ्या दासींच्या पालख्या किल्ल्यांत मोठ्या लगबगीनें निघाल्या, त्यांत बसून **पद्मिनी** व **भीमसिंह** हीं मोठ्या युक्तीनें तेथून निसटून किल्ल्यांत सुखरूप पोहोंचलीं. **पद्मिनी** गेली व **भीमसिंह**ही हातचा निसटला, हें पाहून **अल्लाउद्दीन** फार खजील झाला व तो परत गेला, असा हा ऐतिहासिक कथाभाग आहे.

बहुविध दिल्लीपतिंच्या नृपनीतीनें बुडे तमीं देश,
न सुचे मार्गक्रमणहि, नरवरही पात्र होति खेदास. १

रवि-शशि-कुलज न दिसती, ग्रह-यवन ग्रासिती तया पूर्ण,
ग्रहणें गमलीं त्यांचीं, ते त्या नच सोडिती अहा! तूर्ण. २

सुखकर दिन जाउनियां, क्लेशद रजनी महीवरी फिरती,
ऐशीच रीति जगतीं, परि मरुदेशांत त्या सुचिर शिरती. ३

झळके उदयाद्रिवरी बालार्क जसा निजाभिनव–तेजें,
तो भीमसिंह तेव्हां चितुरावरि शोभला सु-नव-तेजें. ४

निज-शुद्ध-कुल-विभूषण, दिनमणिचा उदय पाहुनी धीर
निजराष्ट्रोन्नतिकार्या चिर शय्या–स्वास्थ्य त्यागिती वीर. ५

भीमद्युमण्युदय शार्दूलादिक-दुष्ट-यवन घाबरवी,
पळवी नग-पुर-कुहरीं, सुचतिल कर्मे कशीं तयां बरवीं ! ६

मरुगगनोच्चप्रांतीं तो झळके, जों स्वविक्रमें तरणीं,
पर-राजनय-तमःपट सरले, खल-शव पडून बहुत रणीं. ७

भीमपयोधर गर्जे, अल्लाउद्दीन सिंह मनिं कोपे,
चित्तांत विचारी कीं, हा रिपु मज आज केंवि आटोपे ? ८

हें सर्व दक्षिणेचें नभ-मंडल फार कृष्ण-घन-युक्त,
परि शक्त भीम घन हा त्यांत दिसे एकमात्र जलयुक्त. ९

मी होउनी मरुत्सम, परि त्यातें सर्व गगनिं फिरवीन,
मत्तेजातें साहिल ऐसा नर आर्य-भूंत नुरवीन ! १०

बोले यथेच्छ ऐसा, करि निज-तनुच्या रण–स्तुतीला हो,
तों चारण–रव ऐके ज्या वाटे चारण–स्तुती लाहो. ११

स्वयशःकथा अनृत बहु परिसुनियां मुदित अंतरीं झाला,
मूढा ज्ञान कुठोनी सत्यासत्याहि त्या कळायाला ? १२

वदती "तुजसम भूवरि तूंच अससि भूप ! अन्य नच वहिला !
राजश्री–वैभव सत्कीर्तीनें शोभतोसि पति महिला. १३

सर्वसुखी तूं राया ! परि पद्मिनि-सौख्य होय तुज काय ?
इहलोकीं न उपजला,स्वर्गींचा जणुं तिचा असे काय ! १४

तीतें जरी ह्मणूं परलोकींची ही परीच, परि साची !
होईल रौप्यकनका समता तैशीच कनकपरिसाची. १५

त्या नरपति भीमाच्या योषिद्रत्नापुढें परी तुच्छ
नानासुगंधयुत तो नवकुसुमांचाच भासला गुच्छ ! १६

सिंहकटी, चंद्रमुखी, कमलाक्षी पद्मिनी रुचिर गात्री !
ह्या आर्यभूवरि मुळीं न दिसे मज तत्समान रसपात्री !" १७

भुलला दुष्ट यवन तो आचार—भ्रष्ट, नष्ट, पापिष्ट !
कष्टद कंटकमय त्या कुपथीं शिरणें जया गमे इष्ट ! १८

आला घेउनि निजबल खल चितुरगडीं तदाच लवलाहीं,
कवणाही न कळे भूवरुनी, तत्सैनिकांत नय नाहीं. १९

त्या गड-कुहरीं करिती रजपुत-हरि गर्जना सुगंभीर,
अंबीर लावुनी निजतनुशीं रणवेश करिती खंबीर. २०

तो भीमसिंह तेव्हां लक्ष्मणसिंहास जवळि बाहूनी,
गहिंवरुनी, प्रेमभरें त्या शिशुरत्नास कवळि बाहूंनीं. २१

"अवलोकिली कधीं नच हे प्रिय पुत्रा ! तुंवा समरलीला,
तव ओष्ट पयःपानें आर्द्र दिसति, संपली न शिशु-लीला. २२

अमुचें काय वदावें, अशनीहुनि कठिण हें हृदय बाळा !
काळासवेंहि झगडुनि, घालूं कंठांत कीर्ती-मणि-माळा. २३

तूं एकलाचि अमुचा वंशज ह्मणुनी न येइं आजीला,
भू-गर्भ-दुर्गपंथें जाउनि बुंदीस भेट आजीला." २४

"हा ! हा ! कैसा जाऊं समयीं सोडुनी तुह्मांस बुंदीला ?
काका ! मिटक्या देऊं, तेथें खाऊनि काय बुंदीला ! २५

उल्हाटयंत्र गोलक त्याहुनि बहु रुचति या मना आतां !
घोर समर करुनि तुह्मां डुलविन येथें, द्युलोकिं निजताता. २६

शकलीकृत होउनि ही तनु होवो गलित आहवीं खड्गें,
परि शय्यागत होउनि नच व्हावी गलित ती महारोगें. २७

रण करुनि यशःकीर्ती मिळवाया होय आमुचें जनन,
मन न असो शोकाकुल, आलें ताता! जरी रणीं मरण ! २८

क्षत्रिय–सुतीव्र–खड्ग–प्रताप दिसतील आज यवनांस,
म्लेंच्छ-रुधिर-जल-मज्जन करितां,आपण बघाल तनयास!२९

जननद, जनकजननि, जन, जनिं नच लावूत बोल कीं मजला,
खल-बल-जलधी मथितां ते मद्भुज-शक्तिच्या करुत नवला !" ३०

गहिंवरुनी भीम पुन्हां वदे "मुला ! लाजवीशि जनकाला,
गमली सुवीरसू ती त्वज्जननी ह्या त्वदीय काकाला." ३१

तों म्लेंच्छ–लिखित आलें; तें तापाचेंच भासलें सदन,
क्रोधें आरक्त तदा भीमाचें पाहवे न तें वदन ! ३२

"नीचा ! येशी, ये ये ! दीपशिखापद्मिनीप्रती भुलुनी,
या भींमसिंहदीपें जाशि पतंगा ! क्षणांत रे जळुनी ! ३३

अहि–मणि वांछिसि भेका? कोल्ह्या! हरि–कवल काय हरिशील ?
साहस करितां मत्ता ! निःसंशय मृत्युलाच वरिशील !३४

बहु पाहिले तुवां जे राजे, रजपूत त्याहुनी अन्य
हा भीम ! सत्य कथितों मूढा ! झालासि बहु अहंमन्य ! ३५

तव युवति आज रडतिल, हसतिल अस्मद्वधू नगावरती,
ह्या तव अपार चमुनें मम नरवर लवहि ते न घाबरती!"३६

रण–दुंदुभि दुर्गावरि दुमदुमती, तद्रवास ऐकोनी,
जाणुनि रणारुणोदय भट धांवति समर धीर हरिखोनी! ३७

रणधीर भीम सजुनी भेटाया जाय पद्मिनीसदना;
म्लेंच्छ-लिखित वार्तेतें कथुनी, निरखी शशांक समवदना.३८

तदधरसुधेसि सेवी प्रेमें, ती पति-मुखाकडे पाहे;
बोले "न ऐकवे हो ! मज दर्पोक्ती तदीय भूपा ! हे. ३९

जिव्हा न काय झडली, वदतां ? लिहितां न काय कर गळला ?
खल-कर लवकर छेदा, नाथा ! हा प्राण फार तळमळला ! ४०

मम चिंता न वहावी, जावें, मज आठवा न युद्धांत;
तरवार करीं घेउनि, द्यावी शिक्षा खलास देहांत !" ४१

तत्स्कंधीं निजकर ती ठेवुनि, बोले "करा स्वरणकार्य !
कीं ज्यास पाहतांना गगनीं सानंद डोलतिल आर्य!" ४२

"समरीं शिरतों, करितों रमणी वध यवन सर्व नर्तकसे !
होतां विधि उलट करी उभय कुलांचेंहि नाम सार्थकसें." ४३

बदली सती " स्वतेजें कंठीं झळके सदैव जो हार
तो मज द्यावा; होतां विपरीत करीन शीघ्र 'जोहार.' ४४

जयहार घालुनीयां, रत्नखचित मुक्तयुक्त जो हार
तो मम त्यावरि घालिन; किंवा यासह करीन 'जोहार.' ४५

जा जा उठा गडे जा ! दिनमणि हा कितितरी वरी आला !
अडखळला दुर्गतटीं सैनिक-गण वेळ त्याजला झाला !" ४६

तों भीषणरव झाला, नगतट पडला तयामुळें पुढला,
कोसळला ढांसळला नरहरि, तेथेंचि उसळुनी गढला. ४७

असि बहु तृषित तयांचे आनंदें करिति रुधिरपानातें,
स्नानातें भट करिती, तद्रण-रव ऐकवे न कानातें ! ४८

तो वीरपुत्र शस्त्रें पर-तनुची करि पळांत रांगोळी !
तद्विक्रम पाहुनियां घाली स्वमुखांत भीम आंगोळी ! ४९

अजयूथ यवन गमती, रजपूत स्पष्ट लांडगे साच !
किंवा रजपूत-हरी, करि-यूथ म्लेंच्छ-वृंद तैसाच. ५०

तैं भीमसिंह भासे भीमचि ! पर-कुरु-चमूंत तो शिरला !
शरसाचि नीट गेला, पदहि न मागें वळून ओसरला ! ५१

अंबरमध्यावरुनी पश्चिम दिक्प्रांतिं दिनमणी ढळला,
भ्रमला श्रमला परि पर-नृप-दुर्योधन न त्यास आढळला. ५२

तों पाहुनि निजभागा, शर करकर दांत खाउनी सोडी !
फोडी गज-गंडस्थल, शर धनुशीं तो पुनः पुन्हा जोडी. ५३

असि घेउनि तेथुनि मग रणमंडल फोडुनी उडाला हो !
जन ह्मणति असुव्यसनीं कीं अजि खल-भूप हा बुडाला हो!५४

करुनि मनोराज्य तदा, निजसदनीं जो यथेच्छ बडबडला,
तो रणिं करिवरि आतां प्राणभयानें बहूत गडबडला ! ५५

खल हस्तिपास सांगे "गज येथुन तूर्ण काढ वळवून !
पळवून ने तयासह मज, ये हा मूर्त काळ खवळून!"५६

गेले यवन पळोनी, सेना घोषा करीत गड चढल्या,
क्षत्रिय–रमणी कितितरी तेव्हां हर्षोत्सवामधें गढल्या. ५७

प्रियमाला पद्मिनिची भीमाच्या कंठिं येउनी पडली,
सृक्कणमय पतिवपुशीं आलिंगुनि तीहि रुधिरमय झाली. ५८

झाला हर्ष परी तो चिर न वसे जगीं अशीच ही रीति!
सारा गढ वेढुनियां शस्त्रें वरिती पुन्हां खल करीं तीं. ५९

पुनरपि त्या नीचाचा कळला संदेश आंत भीमातें,
"हो यास पद्मिनीचें दर्शन, राजा! शिवे न भी मातें! ६०

तद्दर्शनार्थ जो जें वांछिल, देईन मी तयास धन,
किंवा समर करूनी, मद्भुज करितील शत्रुचें निधन. ६१

शुद्ध मनें तद्दर्शन वांछिशि तरि दर्पणीं दिसे यवना !
भीम जिवंत असे तोंवरि तें प्रत्यक्ष होइना नयना !" ६२

मान्य करुनि तद्वच तो, दुर्गेशासहित त्या नगीं शिरला,
साध्वी सुदर्शनानें पूतचि होऊनि परत मग फिरला. ६३

आतिथ्यरीति ऐशी, "द्वारापर्यंत त्यासवें जावें,"
ह्मणुनी भीम तयासी दुर्गद्वारांत पोंचवी भावें. ६४

त्या खलकपटपटूनें कटक तिथें गुप्त ठेविलें होतें,
तेणें तत्काळ अहा ! भूप–शिरोरत्न अडविलें हो ! तें. ६५

निःशस्त्र बद्ध करुनी नीचांहीं धीरवीर तो धरिला,
चितुराचा पद्मिनिचा हा!हा!सौभाग्य-तिलक कीं हरिला ६६

चिंताक्रांत अधोमुख स्मरती भट सर्व भीम-रण-कर्मे,
निजवाग्शस्त्रें छेदी तेव्हां ती पद्मिनीच तन्मर्मे. ६७

"नेला मुकुट हिरावुनि! परि कैसे स्वस्थ असति हे काय?
कां षंढ सर्व झालां ? शौर्य लवहि राहिलें नसे काय ? ६८

निज-कुल-शुद्ध यशास्तव उठा ! करा पूर्वजासम रणातें !
जाणें कधीं तरी, मग भीतां रणिं कासयास मरणातें ? ६९

पर काक गृहीं शिरुनी, तुमचा घेऊनि जाय वीरमणी !
तुह्मी खगवर असुनी,स्वस्थ कसे?" बोलली असें रमणी.७०

"कपटाशीं कपट करुनि लवलाहीं कार्य-हेतु साधावा,
पदिंचा कष्टद कंटक घेउनि कंटकचि तूर्ण काढावा. ७१

कां मौन तुह्मीं धरिलें? कां न कपटमार्ग सुचते? कांहीं हो!
तरि कथितें दैवहता ऐका; अजिताचि बालिका ही हो. ७२

येतें दासीसह मी, खलास कळवा, तसेंच सर्वांनें,
अडवूं नये, बघुं नये, माझ्या ह्या सर्व पारिबर्हातें." ७३

बोलाविल्या शतांदोलिका, बसविलीं तयांत नररत्नें,
स्त्रीरत्न पद्मिनीही बैसे, त्या वाहती भटच यत्नें. ७४

आली पद्मिनि पाहुनि, तदर्थ तो करवि एक पट-सदन,
लव न तिचें कपट कळे, स्वयेंचि तो असुनही कपट-सदन. ७५

आंदोलिकालि-तरणी खल-बल जलधींत शिरति वेगानें,
दासीकृत नरपुंगव दास-ध्वनि आयकूं नये कानें! ७६

हो भीमपद्मिनीची अंतींची आज एकदां भेट,
जाणाऱ्या दासींना परतुनि किल्ल्यांत जाऊं द्या थेट. ७७

आंदोलिका परतल्या दासींच्या, दुर्गी जाउनी बसल्या,
भीमास पद्मिनीला पाहुनियां तत्सख्या बहू हसल्या. ७८

मुरडुनि, खोंचुनि हसती भीमातें, परि न वदति निःशंक,
विषय-प्रवेश करितां नव कवि होतात जेंवि साशंक! ७९

"अजुनी न जाहली कां भेट?" वदे, "जाहला बहू वेळ!"
अद्यापि पद्मिनीचा नीचा! त्वां जाणिला न कां खेळ? ८०

सारूनी डौर वरती, सर्वचि ते नरहरी उड्या घेती,
पळण्या न वेळ उरला! पर—दीन स्थिति न पूर्ण कथवे ती! ८१

पर—चमु—तरंगिणीहुनि रजपुत—सेनाब्धि फार भरभरला,
'अल्ला' ह्मणतचि अल्लाउद्दिन मंडूक त्यांत डरडरला! ८२

रजपूत उद्धतासी म्लेंच्छासी क्रुद्ध भुजगसे गमले !
पर—नर गरयुत व्हाया बल हालाहल पुनःपुन्हां वमले ! ८३

आशाच पद्मिनीची नुरली, प्राणार्थ मात्र ती उरली,
बावरली, घाबरली तन्मति, असुभीति मग मनीं शिरली. ८४

प्रोत्साहन देती निज—कटक—भटांना न तेहि ओसरती,
तें रणवर्णन करितां, ह्या कविचे शब्द मात्र हो, सरती ! ८५

निर्वाणिचा समर जो झाला, तो पाहवे न नयनांस !
धडपडतां, गडबडतां, पळतां त्या पाहवे न यवनांस ! ८६

पळती, लपती, दडती कुठें तरी प्राण—भय धरूनि मनीं,
जे उरती ते सिद्धचि भीम—पदीं दीन होउनी नमनीं. ८७

वाजत गाजत साजत रजपुतसेना गडाकडे वळल्या,
पाहुनि दुरुनि तयातें शुभरणवार्ता गडांत त्या कळल्या. ८८

भीमास पाहुनी, त्या सेना जयघोष करित ओरडल्या,
पहिल्याहूनहि आतां रजपुत तरुणी विशेष हो ! रडल्या. ८९

भीमाच्या पद्मिनिच्या अंतरिंचा मोद काय वर्णावा ?
कवि-शब्दांहि न कथवे ! कल्पकतेनेंच पूर्ण जाणावा ! ९०

# विषमता.

## शार्दूलविक्रीडित.

लक्ष्मीपुत्र कुणी जगीं विलसतो, नाना सुखें भोगतो,
दारिद्र्यांत कुणी पहा निपचतो, भोगीत दुर्भोग तो;
कोणा अन्न न खावयास, इतरां सुग्रास कीं भोजनीं,
कैसी ही परमेश्वरा ! विषमता निर्मीयली भो ! जनीं ? १

आकाशांतरिं चंद्र सूर्य फिरती राहूनि रात्रंदिन,
कैसा सूर्यचि सप्रकाश विधु कां राहेचि तेजोहिन;
व्हावा क्षीण विधू कलंकयुतही, निर्दोष सूर्यस्थिति,
ऐशी ही परमेश्वरा ! विषमता निर्मीयली तूं किती ! २

तेजें पूर्ण नभांगणीं प्रमुदिता जेथें उषा नांदते,
तेथें हाय ! कराल रूपिणि निशा नाचे कशी; सांग तें !
एकाच स्थलिं सूज्ञ मूर्ख रमती, आश्चर्य वाटे मनीं,
कैशी ही परमेश्वरा ! विषमता निर्मीयली ह्या जनीं ! ३

नाहीं प्राप्तहि एक अंबुकण तो त्या चातका भूतलीं,
हंसासाठिं परी कितीक भरलीं येथें स्वयंभू तळीं;
जो जें याचि न तें तयास मिळतें, निर्याचकाला मिळे !
ऐशी कां ? परमेश्वरा ! विषमता निर्मीयली ना कळे ! ४

सर्वांनीं नव सृष्टि ही प्रतिदिनीं पाहूनियां तोषणें,
नाहीं हें सुख त्या उलूक विहगा दृग्दोषही साहणें;
आहे सौख्यद जें कसें न वितरे तें योग्य काळीं बरें,
ऐशी त्वां परमेश्वरा ! विषमता निर्मीयली कां बरें ? ५

# समस्यापूर्ति.

## समस्या पहिली.

द्वारीं मद्विरहाकुला प्रियसखी होती उभी एकटी,
दीर्घोष्णोच्छ्वसनें उरोपट जिचा येई कुचाच्या तटीं;
पाहूनी मजशीं विलोल नयना होऊनि आनंदिता,

*    *    *    *

[1]गेली हांसत सांवरीत पदरा गेहांतरीं लज्जिता!

[2]वेगें सांवरुनी उरोपट, स्रवे प्रेमाश्रु मंदस्मिता!

[3]लज्जेनें पट सांवरीत शिरली ती मंदिरीं तत्वता!

[4]जाई सांवरुनी उरःपट जवें अंतर्गृहीं लज्जिता!

[5]आलिंगी मजला त्वरा करुनि जी झाली समुत्कंठिता!

---

१ तिवारी. २ गिरीश. ३ वसंत-विहार. ४ कृ. वा. कुळकर्णी. ५ र. श्री. चांदेकर.

## समस्या दुसरी.

मी दूरांतरिं जावयास उठलों कांतेकडे पाहत,
खालीं पाहत तर्जनी हनुवरी ठेवी प्रिया स्फुंदत;
पूर्णेंदू-मुखिं खिन्नता जणुं नवी कादंबिनी पातली,

* * * *

[1]पीनोत्तुंग कुचाग्रशैलशिखरीं वृष्टी करूं लागली!

[2]विद्युल्लोल तयामधें चमकुनी वृष्टी असे जाहली!

[3]येऊं ना? ह्मणतां मदीय सखिनें कंठीं मिठी घातली!

[4]वाटे रोदनमेघ-गर्जित तिचें, पर्जन्यबाष्पावली!

[5]होवोनी बहु दुःखिता मम तिनें कंठीं मिठी घातली.

---

१ तिवारी. २ गिरीश. ३ वसंत-विहार. ४ कृ. बा. कुळकर्णी. ५ र. श्री. चांदेकर.

# घना !

## शिखरिणी.

बलाकांच्या पंक्ती करित तव आतिथ्य फिरती,
पिसारा साराही शिखि पसरुनी नृत्य करिती;
अनेका केकांचा रमवि किति गानध्वनि मना,
वरी खालीं ऐसा कितितरि तुझा गौरव घना ! १

सुगंभीरा ! धीरा ! नभसमर वीरा ! तव गिरा
किती भीती देती, मति विमुढ होती, नभचरा !
परी सारी वारी, तव मधुर वारी सभयता,
विरोधी शोधी हे गुण निवसती जे उभयतां. २

जरी कोपें तापे बुध परि परार्थाच करितां
सतांच्या कोपांतीं सतत भरते स्नेहसरिता;
पयोदा ! जो दावी वरिवरि बहु प्रेम अपुलें,
अशांच्या नादींही जन कितिक हे लागति भले ! ३

तृणाधारा ! धारा जलतति उदारा ! जलधरा !
मनस्तापा बापा ! प्रशमिति अमूगा प्रियकरा;
मघांशीं आकाशीं उडुगण अतां तूंहि फिरशी,
विलोकीं लोकीं कीं कुणिहि न धरी लोभ निरसीं. ४

नियुक्ता संयुक्ता, परि चपल मुक्ता नभलता,
असा कैसा केला तिजसह तुवां वाद भलता !
सुभाग्यें सौभाग्यें क्षणिं विलसली जी तुजसवें,
सवें वेगें ये, ती त्यजुनि भुवनीं सर्व विभवें. ५

क्षितीजाशीं जाशी नविन, जलराशी मिळविशी,
प्रचंडा मार्तंडा पुढति अभिमानें वितरशी;
विशुद्धा संबद्धा किरणशरविद्धा बघुनियां
तुझ्या प्रेमें इंद्र स्वधनुहि उभारील सखया ! ६

महीपृष्ठीं वृष्टी करुनि जनसृष्टी सुखविली,
घना ! नाना स्थाना शुचिसुख विधाना बहु दिली;
नगोत्तुंगी शृंगी पवन सुतरंगी विरमशी,
कशी होईना ती तव तनु सुपूज्या मग अशी. ७

कुठें कांठीं कांठीं जल झुळुझुळू वाहत असे,
तुझ्यासाठीं मोठी अहह ! दिन जी कंठित बसे;
पयोदा ! जा जा ! त्या तटिनिगृहिं, तीतें न झुरवीं,
मुखीं सत्प्रेमाचा जलकर तुझा शीघ्र फिरवीं. ८

# बा ! दावानला !

## शार्दूलविक्रीडित.

येऊनी घन नील शांतविति भू संतप्त धाराजलीं,
होऊनी अमलान्विता नवमही तेणें बहू राजली;
हेमंतें सदलंकृता करुनियां गेला न मासावधी,
तों ही निर्घृणता तुवां पसरिली कैशी खला ! मंदधी ? १

वृक्षांहीं परिवेष्टिता तरुलता जेथें बहू डोलल्या,
प्राशोनी मकरंद भृंगततिही तैशा सुखें हिंडल्या;
जेथें मोर पिसें उभारुनि बरीं आनंदुनी नाचले,
तेथें स्वैरपणें तुवां अजि असें हें काय आरंभिलें ? २

झाले त्रस्त पशू तृणाविन जईं, संतप्त होती इथें,
तूं कां व्यर्थ बरें तदीय अशना संहारिशी बा ! तिथें ?
वृद्धा जाहलि ही धरा, न गृहिं तत्सद्बंधु मेघावली,
तूतें हें करण्या विडंबन तिचें संधी बरी फावली ! ३

ज्वाला ह्या गगनीं तुझ्या उसळती राहूनि राहूनियां,
काष्टांचा उठतो ध्वनी कडकडा चोहींकडे त्यांत हा;
झालों काननिं मी तटस्थचि असा त्वद्रूप हें पाहुनी,
"होते आंतिल कल्पना कधि कधीं ती बाह्यरूपाहुनी." ४

ज्यांहीं प्रेमभरें धरा प्रतिदिनीं ही न्हाणिली येउनी,
ज्यांहीं भूषविली जणों हरित तो शालू करीं घेउनी;
वर्षर्तू घनसंगमें मितदिनीं येती जईं बा इथें,
तैं त्यातें कथिशील काय ? अथवा जाशी लपोनी कुठें ? ५

पाहोनी तत्र दुष्कृतीस, घन हे सक्रोध कीं जाहले !
जाणों तन्मुखिंही झणीं पसरली आरक्तता त्यामुळें !
क्रोधोर्मी उठती मनीं तदिय ह्या गंभीर कीं गर्जना,
कोठें तूं असशी कसा न दिससी आतां खला दुर्जना ? ६

हीतें भूषवुनी तशीच जलदश्रेणी फिरे ती पुन्हां,
"कीं जो दंडियला अपाय न करी," हें सत्य वाटे घना !
हा ! हा ! काय वनानला फिरुनियां त्वां हेंचि आरंभिलें !
"जाल्या जे खळ तन्मती न वळते" हें तत्त्व आहे भलें ! ७

रे ! रे ! बाबरली पहा ! हरिणि ही त्वज्ज्वालरेषांतरीं,
प्राणार्थी पथ शोधिते, न गवसे, हो दुःखिता अंतरीं;
गाळी तत्पति अश्रु तद्रमणिही भावी वियोगानळें,
हा ! हा ! देखत घात तद्रमणिचा केला खळें त्वां बळें ! ८

त्वज्ज्वाला, ध्वनि, धूर पाहुनि, जणो वर्षर्तु हा पातला,
ऐसें जाणुनि, बर्हिवृंद अवघा नाचावया लागला;
वृक्षांच्या समवेत भक्षुनि तया त्वत्तृप्ति ना जाहली !
येथें मात्र अतां तुझी अदयता संपूर्णता पावली ! ९

हो, हो, शांत गड्या ! पुरे, न अजुनी कां कोप हा जाहला ?
कीं ज्या घर्षण मात्र कारण असे तो शांत होवो भला !
छे ! मी काय असें खला कथितसें, ज्या लेश ना हें रुचे,
होता हें तृणहीन कानन तदा जाळावया कायसें. १०

# एका कवीचा सरस्वतीमंदिरप्रवास.

## मंदाक्रांता.

होतें माझें शिशुपण तईं बोबडे बोल बोलें
'पाती तोपी' नकळत असे, मंदसा फार चालें;
शाळेमध्यें ह्मणुनिच मला पाठवीती न तात,
भीती देती रडत असतां मात्र तीची मनांत. १

गेले कांहीं दिवस मग मी नीटसा मार्ग चालें,
तें पाहूनी मजसि जनकें पाठशाळेंत नेलें;
जाईना मी निज जननिच्या प्रेमभावें स्वभावें,
लोळें भूमीवरि मज कसे ज्ञात तद्धेतु व्हावे. २

वाटे, देती उगिच मजला त्रास हा कासयासी ?
रुग्णातें का अगद रुचतें, वांच्छि तो का तयासी ?
जेव्हां कांहीं मजसि कळलें वाटलें कीं मनातें
वाग्देवीचें नवगृह तरी दृष्ट होईल का तें ? ३

चिंताब्धीच्या उठति लहरी, त्याकडे वेध लागे,
गेले जाती विबुध–जन ज्या शिक्षण–ज्ञान–मार्गें;
त्या मार्गें ने गुरु मम ह्मणी मार्ग माझा चुकेना,
त्या वृत्तीचीं सुखद कथनें पूर्ण तीं वर्णवेना ! ४

मार्गीं त्यांच्या अभिनव अशा काव्यवृक्षावलींची
होती दाटी, ह्मणुनि पसरे थंड छाया तयांची;
मातें येई मधुरतर जो गंध त्यांच्या फुलांचा
त्यायोगें हा मधुकर फिरे गुंग होऊनि साचा. ५

तेथें नाना रसिक अलि जे हिंडती मत्त–गंधें
ते भारी हो, कवनकुसुमा सेविती त्या मदांधें;
कालीदासोत्पलकवनसुमें प्रीय त्या फार वाटे !
प्रेमें त्यांचा सुखद रस ते प्राशिती, जो न आटे. ६

मल्लीनाथें तरुशिं जल जें ओतिलें भाष्यरूपें,
त्यामध्यें जो सुम–रस गळे तो दिसे अर्थरूपें;
त्यातें प्राशी निजमनिं डुले तेथुनी जाववेना,
त्या स्वादाची कवनिं मजला पूर्णता आणवेना. ७

सन्मार्गीं जे गुरु मज बरें लाविती ते फिरून
मागें होवो नच चुकुर ते मित्र माझे ह्मणून
'ह्या मार्गानें तुज यश मिळे' जाति ऐसें वदून,
प्रेमाश्रू हे गळति मम तत्सत्कृती आठवून. ८

एकाकी मी तिथुनि पुढतीं चाललों त्याच नादें,
वृक्षांतूनी सुरभियुत तो वात वाहे सुनादें;
त्या पंथींच्या मधुकर, खगा पाहुनी तोष होई,
जी दे मैत्री व्यसन–समता ती न हो लुप्त कांहीं ! ९

झाले पंथ–श्रम बहु मना, झोंप येई प्रशांत,
तों जें चित्तीं दिनभरि वसे तेंच देखीं तियेंत !
कोटी–सूर्य–द्युति मज दिसे, नेत्र हे दीप्त झाले,
वाग्देवीचें कमनिय असें गेह पाहूनि धाले ! १०

उच्च–स्थानीं मयुर–वहना देखिली प्रीयमूर्ति
हस्तीं वीणा धरुनि वरुनी तर्जनी जात होती;

भासे सारें द्युतिमय, मनीं मानिले भाग्यवंता
पाहूनी ती हिम–नग–सुता–पुत्र–कांता सुशांता. ११

श्रीदेवीच्याभवतिं दिसली बाल–लीला मजेची,
कांहीं अंकीं बसुनि चव ते घेति तत्सत्पयाची;
कांहीं कांहीं मधुर करिती मंजु गान स्वनानें,
त्या पाहूनी किती तरि गमें अज्ञ मी मन्मनानें. १२

बाही त्या ती कमलनयना प्रेम–भावें सुजाणा,
या ! या ! ऐशी मधुर वदली दंडि ! हर्षा ! सुबाणा !
येईं माघा ! जवळि छकुल्या कालिदासा ! झणीं ये,
तों हर्षानें सकळ धरिती धांवुनी अंबरातें. १३

मी तद्घोषें नयन उघडीं, तों न कांहीं दिसे तें,
तैसाची मी उठुनि पुढतीं चाललों फार मोदें;
अद्यापीही गम्रन करितों सांगणें हें कशाला !
देती भारी दिवस सुख हे रम्य माझ्या मनाला. १४

हा ! वेड्या वाग्वधुगृह खरें दृष्ट हो का जगांत ?
मानीं ज्ञानद्युतिस रसिका ! जाण ! तें ती मनांत;
शोधीं ! तूंही मजसम गड्या ! हिंडतोसी तदर्थ
याहूनी ते अधिक कवनीं काय सांगू यथार्थ ? १५

## एका दुःखितास—

सुखदुःखाचें चक्र फिरतसे त्यांतुनि सुटला कोण बरें !
त्यांतचि पडली दुर्दैवाची उडी तुझ्यावरि हेंहि खरें.

नसे जिवाला चैन, मनाचा मावळला आनंद परी,
नसे संकटीं कोणि कुणाचा धीर तुझा बा ! तूंच धरीं !
काळाच्या दाढेंत किती
रम्य मूर्ति बा ! आदळती
नसे कुणाची तया क्षिती
चंद्रबिंबही कलंक लागुनि क्षयी होउनि गगनिं फिरे
सुखदुःखाचें चक्र फिरतसे त्यांतुनि सुटला कोण बरें ! १

मनांत ह्मणसी मीच कसा या जगीं अभागी उरें तरी ?
दिशाभूलही तुला होय या निबिड काननीं अहा ! परी;
दुःखांतहि आनंद असे,
साधुवृंद त्या चाखितसे,
सत्य अह्मां तें जरि न दिसे,
वैकुंठपुरी सोडुनि श्रीहरी पहा ! बळीचे द्वारिं फिरे !
सुखदुःखाचें चक्र फिरतसे त्यांतुनि सुटला कोण बरें ! २

असो चांगलें, नसो तसें वा, निसर्ग जाई पुढें पुढें,
विषाद मानुनि काय ह्मणुनि दुःखांत चित्त बापुडें पडे ?

सृष्टीचीं उद्यानें जीं
वर्षतूनें पालवलीं
शशिरें कितीतरी हालवलीं
झाल्या परि त्या शुष्क पुष्प—वाटिकापुढें तेजांशु करें
सुखदुःखाचें चक्र फिरतसे त्यांतुनि सुटला कोण बरें! ३

तूं सांपडशी आज, उद्यां मी, आणिक हे त्यांतचि परवां,
हा सृष्टिक्रम ह्मणूं तरी तीचीहि नसे त्यासी परवा.
ॐ शब्दमय ध्वनी कुठें!
स्थित्यंतर जड पृथ्वि कुठें!
सत्य परी शंका न फिटे
ह्मणुनि त्यांत सांपडतां मनिं हें समाधान मानणें बरें ४
सुखदुःखाचें चक्र फिरतसे त्यांतुनि सुटला कोण बरें!

आकाशांतिल रम्य तारका, दिव्य गोल ही हे सारे,
स्थित्यंतर तेजोऽन्तर पावति ह्मणती जोतिर्विद सारे;
दुर्दैव ज्यास बा! ह्मणति जनीं
निगूढ हा क्रम दिनरजनीं
कळे न जइं हा कुणा मनीं
तईं त्यांत सांपडतां मनिं हें समाधान मानिती त्वरें
सुखदुःखाचें चक्र फिरतसे त्यांतुनि सुटला कोण बरें! ५

# टेनिस.

## शार्दूलविक्रीडित.

काव्याच्या नव दोलनीं बसुनियां प्रार्थूनियां कालिका
लागे गान करावया हळुहळू मत्कल्पना बालिका;
श्रीमंतें रसिकें तिच्या श्रवुनियां त्या मंद मंजुस्वना
केली 'टेनिस वर्णनात्मक कथा' ही गावया सूचना. १

आट्यापाट्या कितिक अपुले खेळ 'खो खो' हि सारे
सोडूनी कां? मग अजि वृथा टेनिसाचे पसारे!
टीकाकारीं उघड बहु ही वाच्यता चालवीली
मच्चितातें मुळिं न रुचतां, लेखणी हालवीली. २

ज्या क्रीडेनें कपिल मुनितें मोहुनी मोहिनीनें
सारा गर्वज्वर उतरिला तत्क्षणीं मानिनीनें;
आहे पौराणिक कथन जें कंदुक–क्रीडनाचें
त्याचें रूपांतरचि गमतें सत्य हें टेनिसाचें. ३

गंगातीरीं सहज पडली गांठ त्या सत्कवींची
देवीलीला बघत असतां कंदुक–क्रीडनाची;
काव्यस्फूर्ती सहज घडली त्याच वेळीं तयांनां,
नानावृत्तीं करित बसले तेथ ते दिव्य गाना. ४

आहे देवप्रिय बहु असा खेळ हा सत्सुखाचा,
कां तो आह्मीं त्यजुनि इतरां बोल लावूं फुकाचा!
राहो सारें, परि परकृती गोड जी भासते ती
कां वाटावी मज न कळतें ध्यावया लाज चित्तीं? ५

येते अंगीं बहु चपलता, धूर्तता सर्वथा हि,
स्पर्धा स्पर्शे–हळुहळु मना वासना व्यर्थ नाहीं;
खेळामध्यें मन विरमतें सांगणें हें न कोणा,
बाल्यत्वाचे सुखद दिन ते सर्व लक्षांत आणा. ६

रम्य स्थानीं रमणिय अशी भूमिका रेखुनीयां
सीमा केल्या परिमित पहा, कंदुकांदोलनीं या;
दोघे चौघे परि न अवघे खेळती प्रेमभावें,
प्रारंभी 'सर्व्हिस' करि, तईं एक अन्यें जपावें. ७


आला–झाला–बघत असतां स्पर्श इष्ट स्थळाला
झाला 'फिफ्टिन् लव' रव दुजा सोडुनीयां पळाला;
सांभाळूनी हळुच दिधला 'ब्यॅट'नें उंच टोला,
बोला? फिफ्टिन् लव् न लवही ऑल ऐशाच बोला. ८

फिफ्टिन् थर्टी गुण मिळवितां फॉर्टिचीही जरूरी
लागे, तैसी सुयश मिळण्या कंदुकाची भरारी;
लॅबीमध्यें यश भरुनियां राहिलें सर्व साचें
चापल्यावांचुनि न मिळतें श्रेय तें टेनिसाचें. ९

गर्दी नाहीं ह्मणुनिच जिथें भांडणें होत नाहीं,
कांगाव्यानें मुळिं न करणें आरडाओरडी ही;
सभ्यांतें हा ह्मणुनिच बहू आवडे खेळ चित्तीं,
व्यायामानें प्रकृति दृढ हो–वाढते पूर्ण शक्ती. १०

'खो खो' खेळूं तरि बहुतची धावणें मात्र लागे,
लागे पाठीं जइं संवगडी काळजा श्वास लागे;
आट्यापाट्यामधिं चपलता पाहिजे ती न त्यांत
आहे थोडे बहुत अवघे फायदे टेनिसांत. ११

कामें जीं दैनिक करुनियां त्रासतें चित्त भारी,
सायंकाळीं सहज गमतो खेळ हा सौख्यकारी;
सन्मित्रांच्यासह हंसुनियां बोलुनीयां जनाला
येई शांती कितितरि बरें सुस्थलीं या मनाला. १२



## ब्रिटिश राज्यापासून फायदे.

### आर्या.

हें आंग्लराज्यउपवन जनभृंगाली रमे तयावरती,
सुतरू भागविभागचि सुधारणावल्लिका तया वरिती. १

ज्या आंग्लनृपवरांनीं या वनिं त्या तरुलतांस लावियलें,
पाळियलें नयसलिलें, कविनें त्या धन्य ह्मणुनि गाइयलें. २

या क्षेत्राख्य तरुतळीं जल जाया पाट सोडिले असती,
लवती मधुफलभारें तेणें हे फार खालतीं येती. ३

धर्माख्य पादपीं गुरुजन शुकपिकसारिका सुखें गाती,
भीति न शिवे जयातें वक्के शिखि होति त्यांस सांगातीं. ४

यांत्रिककलालतांचीं अळीं धनजलीं भरी नवीन वनीं,
तूं धन्य उपवनेशा चतुर दुजा धोरणी न या भुवनीं. ५

नाना कलाकुशलता शुष्कलता जाहल्या अहा ! होत्या,
शारदशोभा फुलवी, डुलवी मुद्रण समीर हा हो ! त्यां. ६

विद्यालयें तडागें पाहुनियां चित्त फार हें रंजे,
लोकल बोर्ड ! स्थानिक–संस्था एकैक ज्यांत कारंजें. ७

सच्छिक्षक कमलसुमें विकसुनि मकरंद त्यांत जो मिसळे,
छात्र–मधुप–राजी ही तत्पानीं चहुंकडूनि बहु उसळे. ८

अग्निरथें, पादरथें, सुपथें जन फिरति फार चोहिंकडे,
हें पोष्ट टेलिफोन् हें, तारायंत्रहि तसेंच हें इकडे. ९

जेथें पेंढारी ठग वनपशु कोलाहल प्रबल माजे,
तेथें सरस्वतीचा वीणारव कर्णमंजु हा गाजे ! १०

ही थंड घनच्छाया शांतीची विलसते सदुपवनिं या,
खलदुष्कृतित्रसित जन घेती विश्रांति तुष्ट होउनियां. ११

उद्यानरक्षणीं जे त्रासविती तुजसि वन्य बा ! राया !
झणिं घेशी रणिं नाना सुतीक्ष्ग असि सज्ज त्या निवाराया. १२

काल व्याल दुकाल न हा रणशार्दूल आंत जैं विवरें,
केंवि बरें दोघांचें दारुण रण वर्णवेल सुकविवरें ? १३

अग्निरथ स्वधनु गमे धान्य शरावलि सुटे तयावरि ती,
यावरि ती खलमति अति बावरतां रिलिफ दुर्ग नावरती. १४

येई हाय ! दुजा हा रोग पहा, ग्रंथिकाख्य मत्त करी,
करिं जरि इनाक्युलेशन असि तरि अरि हा बहूत नाश करी. १५

हा ! हा ! धन्य नरेशा ! जार्जा ! तूं ! त्वत्पिता पितामहिही,
शांतविली, भूषविली थोर कुली जन्मुनी भली महि ही. १६

बा ! राया ! वाराया जनदुःखें तूं चिरायु भूवरि हो !
वात्सल्य सत्सरोवरिं तटिनी ही राजनिष्ठता वाहो ! १७

जैसा सत्तटिनीचा तो अस्खलित प्रवाह कीं वाहे,
कविशब्द मात्र सरती नृपयश वर्णन तसेंच हें राहे. १८

पुस्तकें कर्त्याकडे खालील पत्त्यावर विकत मिळतीलः—

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी,

असि. मास्तर, मराठी स्कुल,

**सावदें, खान्देश.**